# सुस्वागतम्

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक,२०२४

## मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण

## २३५ - लातूर शहर विधानसभा मतदारसंघ

**मा.श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे (भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**जिल्हा - लातूर**

**मा. श्री डॉ. भारत कदम**
**उपजिल्हा निवडणूक अधिकारी, लातूर**

**रोहिणी न-हे-विरोळे**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**२३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघ**

**सौदागर तांदळे**
**स.निवडणूक निर्णय अधिकारी,**
**२३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघ**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## २३५ - लातूर शहर विधानसभा मतदारसंघ

## महत्वाचे दुरध्वनी क्रमांक

| निवडणूक अधिकारी | संपर्क क्रमांक |
|---|---|
| मा. वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,लातूर | 02382-223234 |
| डॉ.भारत कदम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, लातूर | 9405896148 |
| रोहिणी न-हे-विरोळे, निवडणूक निर्णय अधिकारी, लातूर | 9823730588 |
| सौदागर तांदळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, लातूर | 7588063140 |
| ज्ञानेश्वर काकडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी,लातूर | 9970807597 |
| गणेश सरोदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, लातूर | 9764301979 |
| अर्चना मैंदर्गी, नायब तहसीलदार(निवडणूक),लातूर | 8149870250 |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२४

| तपशिल | कालावधी |
|---|---|
| ▪ अधिसूचना प्रसिद्धी | २२/१०/२०२४ |
| ▪ नामनिर्देशन पत्र दाखल शेवट दिनांक | २९/१०/२०२४ |
| ▪ नामनिर्देशन पत्रांची छाननी | ३०/१०/२०२४ |
| ▪ नामनिर्देशन पत्र मागे घेणे | ४/११/२०२४ |
| ▪ मतदान | २०/११/२०२४ |
| ▪ मतमोजणी | २३/११/२०२४ |

- आचारसंहिता लागू झाल्याचा दिनांक – १५/१०/२०२४

- सार्वत्रिक निवडणूक करिता लातूर शहर विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्र संख्या - ३८८ + १(सहाय्यकारी मतदान केंद्र)

- एकूण मतदार संख्या – ३,९८,३३३

- नियुक्त केलेले क्षेत्रिय अधिकारी यांची संख्या – ४१ + ७ राखीव = ४८

# मतदानाचा दिनांक व वेळ

दिनांक 20 नोव्हेंबर 2024 (बुधवार)रोजी

सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होईल.



# मतदान अधिकारी प्रशिक्षण कार्यक्रम

- ❖ प्रथम प्रशिक्षण : दिनांक : २७ ऑक्टोबर २०२४ रोजी,ठिकाण- दयानंद महाविद्यालय लातूर

- ❖ द्वितीय प्रशिक्षण: दिनांक : १२ नोव्हेंबर २०२४ रोजी,ठिकाण- दयानंद महाविद्यालय लातूर

- ❖ तृतीय  प्रशिक्षण : दिनांक : १९ नोव्हेंबर २०२४ रोजी,ठिकाण- शासकीय महिला तंत्रनिकेतन बार्शी रोड, लातूर

❖ **मतदान अधिकारी प्रशिक्षण वेळी क्षेत्रीय अधिकारी समवेत प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणी करून प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.**

# मतदान अधिकारी नियुक्तीबाबत कायदेशीर तरतुदी

## लोकप्रतिनिधित्व अधिनियम- १९५१ मधील तरतूद

- ❑कलम २६ नुसार आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे.
- ❑कलम २८- क नुसार प्रतिनियुक्तीवर आहात.
- ❑कलम १३४ अन्वये निवडणुकीच्या कामात टाळाटाळ किंवा दिरंगाई केल्यास शिक्षेची तरतूद

## लोकप्रतिनिधित्व अधिनियम- १९५१ मधील तरतूद

| कलम | तरतूद | शिक्षा |
|---|---|---|
| कलम १२८ | मतदान गुप्त राखणे. मतनोंदणी अथवा मतमोजणी संबंधात काम करणाऱ्या अधिकारी,लिपिक किंवा अन्य ईसम यांना मतदान गुप्त राखावे लागेल. | ३ महिन्यापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा. |
| कलम १३४ क | शासकीय कर्मचाऱ्याने निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी म्हणून काम न करणे. | ३ महिन्यापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा. |
| १७१ ड | निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे. (तोतया मतदार) | १७१ ड |

# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

1. NAV – Notified Absentee Voters –गैरहजर किंवा अनुपस्थित मतदार यांच्याबाबत करायची कार्यवाही

   AVSC : वयस्क मतदार 85+ वय असणारे

   AVPD : PwD(दिव्यांग) मतदार

   AVES : मतदान कर्तव्यावरील मतदार

   AVCO : COVID-19 बाधीत मतदार

- अनुपस्थित मतदार AVSC,AVPD,AVES,AVCO साठी टपाली मतदान.
- निवडणूक कर्तव्यावर अधिकारी/कर्मचारी टपाली मतदान साठी "सुविधा केंद्र" (Facilitation Center)
- Know Your Candidate(KYC) App चा वापर आणि प्रक्रिया.
- Voter Information Slip(VIS) :- Photo Information Slip(PVS) च्या ऐवजी Voter Information Slip(VIS) मतदार माहिती स्लीप दिली जाईल.ज्यात मतदारांना त्यांच्या मतदान केंद्रांची सविस्तर माहिती मिळेल.
- AVIS(Accessible Voters Information Slip) : दृष्टिहीन किंवा अंध व्यक्तींना ब्रेल सुविधांसह सुलभ मतदार माहिती स्लिप जारी करण्याच्या सूचना.
- मतदार यादीच्या चिन्हांकित प्रति मध्ये PB,EDC, Deleted, Deleted-2 (23 जानेवारी 2024 नंतरची यादी) चा समावेश.

# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

- चिन्हांकित मतदार यादी मतदार नोंदणी अधिकारी व प्राधिकृत अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या असतील.
- मतदार यादीच्या एका प्रतिवर वरच्या बाजूवर निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सही केलेले जोडपत्र 4 मधिल प्रमाणपत्र.
- गुलाबी कागदी मोहोर तसेच हिरवी कागदी मोहोर मध्ये बदल (मतदान यंत्र मोहोरबंद करण्यासाठी पट्टी सील ABCD आवश्यकता नाही.)
- अभिरूप मतदान वेळी VVPAT मधुन निघालेल्या 7 चाचणी चिठ्ठ्या देखिल मॉकपोलच्या 50 चिठ्ठ्या सोबत काळ्या लिफाफ्यात सीलबंद करणे आवश्यक.
- प्रत्यक्ष मतदान दरम्यान CU किंवा VVPAT बॅटरी सदोष झाल्यास बदलता येणार.
- मतदान साहित्य संकलन मध्ये बदल-नवीन प्रकारे सहा पाकिटे कलर कोडसह संकलित होणार
- मतदान सुरुवात करताना मतदान अधिकारी 2 कडील मतदार नोंदवहीत (नमुना 17 अ) मध्ये केंद्राध्यक्ष यांनी स्वाक्षरी करून "नियंत्रण युनिट तपासणी केली आहे.व एकूण शुन्य असल्याचे आढळले आहे" अशी शाईने नोंद करण

# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

- मतदान केंद्राध्यक्ष व सुक्ष्म निरीक्षक मतदान केंद्रात ध्वनीरहित (silent mode) मोबाईल वापरण्यास परवानगी.
- मतदान केंद्राला भेट देणारे अभ्यागत साठी VISIT SHEET नमुना.केंद्राध्यक्ष दैनंदिनी मध्ये तपशिल देणे आवश्यक (मुद्दा 19 ब)
- विधानसभा मतदार संघातील कोणताही मतदार त्या मतदारसंघात मतदान प्रतिनिधी म्हणुन नेमणुकीस पात्र. ग्रामपंचायत प्रधान/सरपंच/पंचायत सदस्य/परिषद सदस्य/महानगरपालिका सदस्य मतदान प्रतिनिधी राहू शकतात.
- महानगरपालिका क्षेत्रात १००% आणि ग्रामीण भागात एकूण मतदान केंद्राच्या 50% मतदान केंद्रावर तेथे वेबकास्टिंग करण्यात येईल.
- मतदान पथक यांना देण्यात येणाऱ्या साहित्यात विविध नमुने BOOKLET स्वरुपात देण्यात येतील.
- मतदानाच्या दुसऱ्या दिवशी छाननीत मतदार नोंदवही (नमुना 17 अ) मधिल शेरा व तिसरा रकान्यातील ओळखपत्र किंवा इतर पुरावे नमूद केलेबाबत तपासणी होईल.

# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

## Modified Pink Paper Seal

Modified Pink Paper Seal FLC दरम्यान CU आणि कमिशनिंग दरम्यान BU दोन्हीसाठी वापरला जाईल, ज्याचा QR-कोडमध्ये Unique Serial Number आणि निर्मितीची तारीख असेल.

Modified Pink Paper Seal कसे वापरावे -

(1) प्रथम, सील दोन स्वतंत्र गुलाबी पेपर सीलमध्ये विभाजित करा.

(2) गुलाबी कागदाच्या सीलमधून चिकटलेले कागद काळजीपूर्वक काढून टाका.

(3) हे दोन गुलाबी पेपर सील मतदान यंत्राच्या खालच्या आणि वरच्या काठावर चिकटवले जावेत.



# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

## Modified Green Paper Seal

- Modified Green Paper सीलच्या 'A' बाजूचा वॅक्स पेपर काढून RESULT विभागाच्या बाहेरील दरवाजावर चिकटवावा. Modified Green Paper सीलच्या 'B' बाजूचा वॅक्स पेपर काढून टाकावा आणि सीलचा अनुक्रमांक दिसेल अशा प्रकारे 'A' बाजू चिकटवावी.
- **<u>Outer Paper Strip Seal is not require to be used to hold Green Paper Seal</u>**




GREEN PAPER SEAL

# विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचे बदल

- PRO च्या डायरीमध्ये नवीन मुद्दा 19B समाविष्ट केला गेला आहे -

१९ब. अभ्यागत नोंदतक्त्याप्रमाणे मतदान केंद्राला भेट देणाऱ्यांचा तपशील

| अ.क्र. | भेट देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पद (निरीक्षक/जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/ सेक्टर मॅजीस्ट्रेट/झोनल मॅजीस्ट्रेट/गस्तीवरील दंडाधिकारी) | भेटीची वेळ | मतदान प्रक्रियेचे संक्षिप्त वर्णन (शांततापूर्ण/अनुचित घटना) | भेटीच्या वेळी असलेला मतदानाचा आकडा | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | नमुना १७ प्रमाणे | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राप्रमाणे |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचारी यांचे टपाली मतदानबाबत माहिती





# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२४

## निवडणूकीचे काम करणाऱ्या मतदारांसाठी टपाली मतदान

- निवडणुकीचे कामकाजासाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी, निवडणूक कामात आवश्यक असणारे/मदत करणारे अशासकीय कामगार (व्हिडीओग्राफर,ड्रायव्हर,क्लिनर,कंडक्टर,मदतनिस) तसेच बंदोबस्तासाठी नियुक्त पोलिस अधिकारी/कर्मचारी,होमगार्ड यांना मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

| तपशिल | Postal Ballot मतदान |
|---|---|
| ▪ अर्ज नमुना | नमुना फॉर्म 12 |
| ▪ फॉर्म 12 भरण्यासाठी आवश्यक बाबी | 1. EPIC प्रत,<br>2. विधानसभा मतदारसंघ क्रमांक<br>3. मतदार यादी भाग क्रमांक,<br>4. अनुक्रमांक |
| ▪ मतदान ठिकाण | सुविधा केंद्रावर (दुसऱ्या प्रशिक्षण ठिकाणी) |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

## निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारांसाठी टपाली मतदान

- टपाली मतदानसाठी पात्र असणाऱ्या मतदारांना टपाली मतपत्रिका सुविधा केंद्रावरच मिळेल तसेच त्याच ठिकाणी मतदान करून परत करावी लागेल.पोस्टाने किंवा दुतावासाने मतपत्रिका मिळणार नाही.
- सुविधा केंद्रावर एक राजपत्रित अधिकारी तसेच तीन मतदान अधिकारी नियुक्त असतील.विविध नमुने,मतदान कक्ष,टपाली मतपत्रिका तसेच मतदानासाठी आवश्यक साहित्य असेल.
- सुविधा केंद्रावरील मतदानाची सर्व प्रकिया व्हिडिओग्राफी केली जाईल.

### ▪ सुविधा केंद्रावर नियुक्त अधिकारी कामकाज-

| प्रथम मतदान अधिकारी | दुसरा मतदान अधिकारी | तिसरा मतदान अधिकारी | राजपत्रित अधिकारी |
|---|---|---|---|
| • मतदार यादीचा प्रभारी<br>• ओळखपत्र व इतर पुरावे आधारे मतदार ओळख<br>• मतदाराची मतदार नोंदवहीत स्वाक्षरी घेणे | • पक्क्या शाईचा प्रभारी<br>• डाव्या हाताच्या तर्जनी ला पक्क्या शाईची खुण करणे | • टपाली मतपत्रिका देणे.<br>• काऊटर फाईल वर स्वाक्षरी घेऊन मतपत्रिका देणे. | • मतदाराचे 13 A मधिल घोषणापत्र साक्षांकित करणे. |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

## निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारांसाठी टपाली मतदान

- टपाली मतदान प्रकिया

- टपाली मतपत्रिका (Postal Ballot Paper)
- नमुना 13 A-मतदाराचे घोषणापत्र
- नमुना 13 B-आवरण (A(आतील लिफाफा)
- नमुना 13 C-आवरण (B(बाहेरील लिफाफा)
- नमुना 13 D- मतदारासाठी मार्गदर्शक सुचना
- सुचना वाचुन कार्यवाही करावी

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

## निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारांसाठी टपाली मतदान

- टपाली मतदान प्रकिया

- टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्यानंतर प्रथम नमुना 13A मधिल घोषणापत्र भरून त्यावर स्वाक्षरी करावी.
- उपस्थित राजपत्रित अधिकारी मतदाराचे ओळखपत्र तसेच टपाली मतपत्रिका क्रमांक नमुना 13 A मध्ये नोंदविला आहे.याची खात्री करून घोषणापत्र साक्षांकित करतील.
- मतदार हा मतदान कक्षात जाऊन नमुना 13B या आतील लिफाफावर मतपत्रिका क्रमांक नमूद करेल. व आपल्या पसंतीच्या उमेदवार समोर

(MARK) ( ) अशी खुण करून गोपनीयरित्या मतदान करील.

- मतदान केलेली मतपत्रिका नमुना 13 B या आतील लिफाफ्यात टाकुन सीलबंद करा.
- नमुना 13 A मधिल घोषणापत्र व मतपत्रिका असलेला नमुना 13 B हे दोघांना मोठा लिफाफा नमुना 13 C मध्ये ठेवुन बाहेरील लिफाफा सिलबंद करावा.
- नमुना 13 C लिफाफा सुविधा केंद्रावरील मतपेटीत टाकावा.

# मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी कर्तव्य

| प्रशिक्षण दरम्यान | संकलन केंद्रावर | मतदानापूर्वी | मतदानादरम्यान | मतदान समाप्तीवेळी |
|---|---|---|---|---|
| • भारत निवडणूक आयोग कायदे,तरतुदी आणि अद्ययावत सुचना माहिती<br>• EVM /VVPAT कार्यप्रणाली माहिती<br>• टपाली मतपत्रिका व निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज<br>• नमुने व अहवाल भरणे बाबत माहिती | • EVM तसेच इतर मतदान साहित्य ताब्यात घेणे.<br>• सुचीनुसार साहित्य तपासणी करणे.<br>• EVM तपासणी करणे.<br>• टपाली मतपत्रिका घेतली असेल तर स्वतःचे मतदान करून घेणे. | • मतदान केंद्र उभारणी<br>• अभिरूप (मॉकपोल) मतदान घेणे.<br>• कंट्रोल युनिट मधुन अभिरूप मतदान नष्ट करणे.<br>• VVPAT मधिल अभिरूप मतदान चिठ्या सील करणे. | • मतांच्या गोपनियतेबाबत माहिती देणे.<br>• मतदान सुरु घोषणा करणे.<br>• मतदान केंद्राध्यक्ष दैनंदिनी मध्ये घटनांची नोंद घेणे.<br>• निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान स्थिती आकडेवारी कळविणे. | • रांगेत उभ्या मतदारांना चिठ्या देणे.<br>• सर्व मतदान पुर्ण झाल्यावर कंट्रोल युनिट CLOSE बटण दाबणे.<br>• VVPAT मधिल पॉवर पॅक काढून घेणे.<br>• EVM व नमुने सीलबंद करणे. |

| प्रशिक्षणाचे 8 भाग |
| --- |
| 1) मतदान यंत्रांची थोडक्यात माहिती |
| 2)निवडणूक साहित्य स्विकृती व तपासणी |
| 3)मतदान आदल्या दिवशी पूर्वतयारी |
| 4)प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापुर्वी कामकाज |
| 5)मतदानास प्रत्यक्ष सुरुवात व मतदान अधिकारी कामकाज |
| 6)मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्वाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही |
| 7)महत्वाचे अहवाल व नमुने |
| 8)मतदान साहित्य जमा करणे |
| 9) PRO : DO NOT FORGET THESE KEY POINTS |

# भाग एक

# मतदान यंत्रांची थोडक्यात माहिती

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ओळख




बॅलट युनिट (BU)      व्हीव्हीपॅट (VVPAT)      कंट्रोल युनिट (CU)

- EVM मध्ये मतदान यंत्र (BU),नियंत्रण युनिट (CU) व मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT) यांचा समावेश होतो. M3 प्रकारच्या मशिन असुन एका CU वर 24 बॅलट युनिट जोडता येतात.प्रत्येक बॅलट युनिट वर 16 उमेद्‌वार म्हणजेच 384 उमेद्‌वार यांचे मतदान घेता येते. मतदाराने केलेल्या मतदानाची पडताळणी VVPAT या स्वतंत्र मुद्रित प्रणालीवर मतदाराला करता येते.

# नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट)

❖ कंट्रोल युनिट द्वारे मतदान प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जाते.एका कंट्रोल युनिट ला 24 मतदान युनिट BU जोडता येतात.



❖ कंट्रोल युनिटचे चार भाग असतात
1) दर्शक विभाग (Display Section)
2) कॅन्डीडेट सेट विभाग (Candidate Set Section)
3) रिझल्ट विभाग (Result Section)
4) बॅलट विभाग (Ballot Section)

**1)दर्शक विभाग (Display Section)**

नियंत्रण युनिटच्या वरच्या भागावर तारीख,वेळ,निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या,मतदान झालेल्या एकूण मतांची संख्या,प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते,निरनिराळ्या त्रुटी संबंधित संदेश इत्यादी यंत्रातील नोंद झालेली माहिती आकडेवारी प्रदर्शित होते त्यास दर्शक विभाग म्हणतात.

A)ऑनलॅम्प (On Lamp)
B)बिझीलॅम्प (Busy Lamp)

# नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट)




**A)ऑन लॅम्प (On Lamp):-**
कंट्रोल युनिट चालु केल्यानंतर हिरव्या रंगाने प्रकाशित होतो.जोपर्यंत कंट्रोल युनिट स्विच ऑन असेल तो पर्यंत हिरवा दिवा चालु राहतो.

**B) बिझीलॅम्प (Busy Lamp):-**
मतदानासाठी बॅलट बटन दाबल्यावर हा दिवा प्रकाशित होतो.हा दिवा मत नोंदविले जाईपर्यंत चकाकत राहतो.व मतदान पुर्ण झाल्यानंतर बंद होतो.

# नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट)




**2) कॅन्डीडेट सेट विभाग (Candidate Set Section):-**
हा भाग आच्छादनाने बंद केलेला असतो. आच्छादन उघडल्यावर दोन भाग दिसतात.

**A) बॅटरी विभाग :-**
डाव्या बाजूकडील भागात पॉवर पॅक असते.त्याला पॉवर पॅक सेक्शन म्हणतात.

**B) कॅन्डीडेट सेट :-**
उजव्या बाजूकडील भागात स्वतंत्र पट्टीने झाकलेला भाग असतो.त्या मध्ये काळया रंगाचे कॅन्डीडेट सेट बटण असते.निवडणूक लढविणाऱ्या उमेद्वारांच्या संख्येप्रमाणे हा भाग सेट करून तो सिलबंद केला जातो.

# नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट)




## 3) रिझल्ट विभाग (Result Section);-

या विभागावर एक पट्‌टीचे झाकण असते ते डाव्या बाजूने उजवीकडे उघडते.या विभागात दोन कप्पे असतात.डावीकडील कप्प्यात Close बटण असते.उजवीकडील कप्पा स्वतंत्र पट्‌टीचे झाकणाने झाकलेला असतो.सदरच्या कप्प्यात Result व Print बटण असते.सदरचा कप्पा Result व Print बटण या मधिल भागात अंगठा व बोट एकाचवेळी दाबून आतील लॅच बटण दाबून उघडता येतो.त्यामध्ये पांढऱ्या रंगाचे Clear बटण असते.

- मॉकपोल (अभिरूप मतदान) नंतर हा भाग हिरव्या पेपर सील द्‌वारे मतदान प्रतिनिधी समोर सिल केला जातो.

# नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिट)

**4) बॅलट विभाग (Ballot Section) :-**

**या विभागात दोन बटण असतात. 1)टोटल बटण 2) बॅलट बटण याशिवाय छिद्रे असलेला जाळीदार भाग असतो ज्यातून आवाज येतो.**

- **त्या वेळेपर्यंत नोंद झालेल्या एकूण मतदानाची आकडेवारी पाहण्यासाठी टोटल बटण उपयोग होतो.**
- **मतदाराला मतदान करण्यासाठी बॅलट बटण दाबून अनुमती दिली जाते. बॅलट दिल्यानंतर कंट्रोल युनिट वरील लाल बिंझी लॅम्प तसेच बॅलट युनिट वरील हिरवा रेडी लॅम्प प्रकाशित होतो.**




## नियंत्रण युनिटचा मागचा भाग

- **कंट्रोल युनिट मागील भागातील पट्टी लॅच बटण खाली दाबून उघडल्यावर उजव्या बाजूला VVPAT केबल जोडण्यासाठी प्लग असतो.**
- **डाव्या बाजूकडे कंट्रोल युनिट चालु-बंद करण्यासाठी बटण असते.**

# मतदान युनिट (बॅलेट युनिट)



- मतदान युनिट मध्ये निवडणुकीचे तपशिल,अनुक्रमांक आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे व छायाचित्र तसेच त्यांना वाटप करण्यात आलेली निवडणूक चिन्ह यांचा समावेश असलेली मतपत्रिका प्रदर्शित केलेली असते.प्रत्येक उमेदवार समोर निळे बटण असते.हे बटण दाबून मतदार आपल्या स्वतःच्या पसंतीच्या उमेद्वाराला मत देवू शकतो.प्रत्येक उमेदवार नावासमोर लाल दिवा असतो.मतदान केल्यानंतर तो प्रदर्शित होतो.व बीप असा आवाज येतो.

- एका कंट्रोल युनिट ला जास्तीत जास्त 24 बॅलेट युनिट जोडता येतात.चारपेक्षा अधिक युनिट वापरावयाचे असल्यास 5 व्या,9 व्या,13 व्या,17 व्या आणि 21 व्या मतदान युनिट मध्ये पॉवर पॅक टाकणे आवश्यक असते.
- अंध व दृष्टीहीन व्यक्तिच्या सोयीसाठी प्रत्येक निळ्या बटणाच्या उजव्या बाजूला ब्रेल लिपीतील अंक दिलेले आहेत.

# मतदान युनिट (बॅलेट युनिट)




❖ **बॅलेट युनिटचे भाग :-**

1)VVPAT ला जोडणारी केबल (Interconnecting Cable)

2)रेडी लॅम्प (Ready Lamp)

3) थंम्ब व्हील विंडो (Thumb Wheel Window)

4)उमेद्वारांसाठी बटण (Candidate's Button)

5)उमेद्वारांसाठी दिवा (Candidate's Lamp)

6)मतपत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग (Ballot Paper Screen)

**बॅलेट युनिट मागचा भाग**

❖ बॅलेट युनिटच्या मागील बाजुस अतिरिक्त बॅलेट युनिट जोडण्यासाठी जोडणी कक्ष व पॉवर पॅक बसवण्याची सुविधा आहे.

# मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT)




Voter Verfiable Paper Audit Trail

❖ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत जोडलेली ही एक स्वतंत्र मुद्रित प्रणाली आहे, ज्यात मतदारांना त्याच्या इच्छेनुसार टाकल्या गेलेल्या त्यांच्या मते तशीच, याबाबतची पडताळणी करता येते. जेव्हा मतदान युनिटवरील बटण दाबून मत दिले जाते तेव्हा व्हीव्हीपॅट प्रिंटरद्वारे उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव आणि चिन्ह असलेली कागदी चिठ्ठी छापली जाते आणि सुमारे 7 सेकंदांपर्यंत पारदर्शक खिडकीतून दिसून येते. त्यानंतर, ही मुद्रित कागदी चिठ्ठी आपोआप कापली जाते आणि व्हीव्हीपॅटच्या मोहोरबंद ड्रॉप बॉक्समध्ये पडते.

# मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT)




➢ **व्हीव्हीपॅट बॅटरी पॅक:-**

(निवडणूक निर्णय अधिकाऱ्यादवारे बॅटरी आधीच व्हीव्हीपॅट युनिटमधील बॅटरीच्या कक्षामध्ये (compartment) बसविली जाते.

➢ **कागदी गुंडाळी (Paper Roll)-**

(कागदी गुंडाळी आधीच व्हीव्हीपॅट युनिटमधील कागदी गुंडाळीच्या कक्षामध्ये (compartment) भरली टाकली जाते आणि पत्ता खुण चिठ्ठीद्वारे ती निवडणूक निर्णय अधिका-याद्वारे मोहोरबंद केली जाते.)

# मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT)

❖ VVPAT वाहतूक करताना पेपर रोल नॉब **आडव्या (Horizontal)** स्थितित ठेवण्याची दक्षता घ्यावी.

❖ VVPAT चाचणी मतदानाकरिता/प्रत्यक्ष मतदानासाठी वापरताना पेपर रोल नॉब **उभ्या (Vertical)** स्थितित ठेवण्याची दक्षता घ्यावी.



# भाग दोन

# निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## निवडणूक साहित्य वितरण व स्विकृती

❖ **साहित्य वितरण दिनांक व ठिकाण :- दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता, शासकीय महिला तंत्रनिकेतन बार्शी रोड लातूर**

❖ **नियुक्ती अंतिम आदेश व वाहतूक व्यवस्था :- दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रशिक्षणावेळी देण्यात येतील.**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## साहित्य वितरण व्यवस्था

| I) मतदान यंत्र | II) छोटी पिशवी | III)मोठी पिशवी | IV)मतदान कक्ष |
|---|---|---|---|
| EVM<br>• BU<br>• CU<br>• VVPAT | महत्वाचे साहित्य<br>• हिरवे पेपर सील<br>• स्पेशल टॅग<br>• गुलाबी पेपर सील व अॅड्रेस टॅग<br>• विभेदक चिन्ह<br>• चिन्हांकित मतदार यादी<br>• ASD/CSV यादी<br>• प्रदत्त मतपत्रिका<br>• उमेदवार नमुना स्वाक्षरी | • नमुना मतपत्रिका<br>• मतदार नोंदवही<br>• मतदार चिठ्ठी<br>• इंडेलीबल शाई<br>• मार्कर पेन<br>• इतर साहित्य बॉक्स<br>• सर्व नमुना फॉर्म<br>• सर्व बुकलेट<br>• उर्वरित साहित्य<br>(जोडपत्र 19 प्रमाणे) | |

# मतदान साहित्य वितरण व स्विकृती

## मतदान साहित्य तपासणी




- ज्या मतदान केंद्रावर आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे, त्याच मतदान केंद्राचे साहित्य ताब्यात घेतल्याची खात्री करावी.
- प्राप्त साहित्याची पथकातील सर्व अधिकारी यांनी तपासणी सुची जोडपत्र-3 प्रमाणे खात्री करून घ्यावी.कमी व दोषपूर्ण असलेले साहित्य नेमून दिलेल्या कक्षातून प्राप्त करून घ्यावे.
- मतदान प्रकियेसाठी अत्यावश्यक असलेले व मतदान केंद्रासाठी विशेषत्वाने नेमून दिलेले साहित्य काळजीपूर्वक तपासुन घेणे आवश्यक.
- यामध्ये EVM,VVPAT,चिन्हांकित मतदार यादी, हिरवे पेपर सील,स्पेशल टॅग,गुलाबी पेपर सील व अड्रेस टॅग ,विभेदक चिन्ह,ASD/CSV यादी,प्रदत्त मतपत्रिका,मतदार नोंदवही,मतदार चिठ्ठी,मतदान केंद्राध्यक्ष दैनंदिनी,नोंदविलेल्या मतांचा हिशोब 17 C या महत्वाच्या साहित्याचा समावेश होतो.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या नमुना सहयांच्या छायाप्रती देण्यात आल्याची खात्री करा.

# मतदान साहित्य वितरण व स्विकृती

## 1)चिन्हांकित मतदार यादी तपासणी

- आपणास चिन्हांकित मतदार यादीच्या (सहा.निवडणूक निर्णय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या एकूण तीन प्रती पुरविण्यात येतील.
- आपणास पुरविलेल्या मतदार याद्या या आपली ज्या मतदान केंद्रावर नियुक्ती झालेली आहे त्याच मतदान केंद्राच्या असल्याची पुर्ण खात्री करून घ्यावी.
- मतदार यादीच्या तीनही प्रती एकसारख्या असल्याबाबत खात्री करावी.आवश्यक प्रमाणे पुरवणी यादी तसेच मूळ यादी गोषवारा पाहण्यात यावा.
- चिन्हांकित यादी म्हणून वापरण्यात येणाऱ्या एका प्रतिवर वरच्या बाजूवर निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सही केलेले जोडपत्र 4 मधिल प्रमाणपत्र असल्याची खात्री करावी.
- मतदार यादीत टपाली मतदान,AVSC,AVPD,AVES,AVCO साठी (P.B), निवडणूक कार्य प्रमाणपत्र साठी (EDC) तसेच नाव वगळणी बाबत DELETED याबाबत नोंदी तपासून घ्याव्यात.
- गैरहजर/मयत/स्थलांतरित (ASD) मतदार यादी व CSV मतदार यादी (लागू असल्यास) वेगळी पुरविण्यात येईल.त्या प्राप्त झाल्याची खात्री करून घ्यावी.
- स्त्री/पुरुष व एकुण मतदार संख्या जुळत असल्याची गोषवारा वरून खात्री करून घ्यावी.

# मतदान साहित्य वितरण व स्विकृती

## 2)मतदान यंत्र (EVM)तपासणी

- संबंधित कॅरींग केसमधून बॅलट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट काळजीपूर्वक काढा.
- तुमची नियुक्ती झालेल्या मतदान केंद्राचेच BU,CU,VVPAT संलग्न आहे की नाही याची खात्री करण्यासाठी त्यावरील अड्रेस टॅग व विभेदक चिन्ह तपासुन घ्या.
- BU,CU,VVPAT चे अनुक्रमांक तपासुन खात्री करावी.

### ❖ बॅलट युनिट :-

1. बॅलट युनिटवरील गुलाबी कागदाचे सील्स व्यवस्थित असल्याची खात्री करावी.त्यावर दोन अड्रेस टॅग व्यवस्थित लावल्याची खात्री करावी.मतपत्रिका व्यवस्थित लावल्याची तपासणी करावी.
2. पहिल्या बॅलट युनिटसाठी थंब व्हील पोझिशन 01 आहे. (01 पेक्षा जास्त बॅलट युनिट असल्यास, दुसऱ्या बॅलट युनिट साठी थंब व्हील पोझिशन 02 आहे, तिसऱ्या बॅलट युनिट साठी 03 आहे आणि याप्रमाणेच पुढील पोझिशन असल्याची) खात्री करावी.
3. BU चे मत देण्यासाठी उमेदवारांच्या संख्येएवढे व NOTA चे निळे बटण खुले (Unmasked) असल्याची व उर्वरित बटण पांढऱ्या रंगात (Masked) असल्याची खात्री करावी.

# मतदान साहित्य वितरण व स्विकृती

## मतदान यंत्र (EVM)तपासणी

❖ कंट्रोल युनिट :-

1. कंट्रोल युनिटवरील गुलाबी कागदाचे सील्स व्यवस्थित असल्याची खात्री करावी.त्यावर अड्रेस टॅग व्यवस्थित लावल्याची खात्री करावी.
2. बॅटरीची स्थिती आणि निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या तपासण्यासाठी कंट्रोल युनिट (बॅलट युनिट आणि/किंवा व्हीव्हीपॅटशी न जोडता) सुरु करा.व खात्री करून बंद करण्यात यावे.
3. Cand Set विभाग निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी व्यवस्थित सिल केल्याची खात्री करावी.

❖ व्हीव्हीपॅट :-

1. पॉवर पॅक (बॅटरी) व्यवस्थित बसवलेली आहे.तसेच व्हीव्हीपॅट वरील अड्रेस टॅग तपासणी करावी.
2. व्हीव्हीपॅट नॉब जमिनीशी समांतर आहे आडव्या स्थितीत (Horizontal) असल्याची खात्री करावी. व्हीव्हीपॅट नॉब उभ्या स्थितीत (Vertical) असल्यास नॉब आडवा करून ठेवा.

❖ साहित्य वितरण केंद्रावर किंवा आदल्या दिवशी मतदान केंद्रावर BU,CU,VVPAT एकमेकांशी कनेक्ट करून हाताळणी करावयाची नाही.

# भाग तीन

# मतदान पूर्वतयारी

# दिनांक : १९ नोव्हेंबर २०२४

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्रावर पोहचणे

- आपणास नियुक्त मतदान केंद्रासाठी दिलेले सर्व साहित्य तपासुन घेऊन क्षेत्रीय अधिकारी यांच्या परवानगी ने नियुक्त केलेल्या बस/गाडी मध्ये संपूर्ण पथकासह जाईल.
- आपले मतदान केंद्रासाठी नियोजित वाहतूक आराखडा नुसार पथकातील सर्व सदस्य,पोलिस कर्मचारी सर्व साहित्यासह क्षेत्रीय अधिकारी परवानगी घेऊन रवाना होतील.
- नियुक्त केलेले वाहन सोडून इतर कोणत्याही वाहनाचा वापर करू नये.
- आपण मतदान केंद्रावर सर्व साहित्यासह सुखरूप पोहोचल्याचा अहवाल क्षेत्रीय अधिकारी यांना त्याच दिवशी द्‍यावयाचा आहे.
- मतदान केंद्रावर एक दिवस मुक्काम असल्याने आवश्यक वैयक्तिक साहित्य सोबत ठेवावे.
- मतदान केंद्रावर आपणास स्थानिक कर्मचारी यांचे साहाय्य देण्यात येईल.त्यांची आवश्यक ती मदत घ्यावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्रावर आदल्या दिवशी पुर्वतयारी

- प्राप्त साहित्य तपासून घेणे.
- आवश्यक फर्निचर उपलब्धता तपासून टेबल व साहित्याची व्यवस्थित रचना करणे.
- सूचना फलक तयार करणे, ज्यावर मतदान केंद्राचा तपशील व व्याप्ती, इशारा, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नमूना 7A मधील यादी, डमी मतपत्रिका व डमी कार्ड बोर्ड EVM मतदान केंद्राचे समोर दर्शनी भागात प्रदर्शीत करावे.
- 100 मीटर व 200 मीटरची मार्किंग करून घेणे.
- 100 मीटरच्या आतील प्रचार साहित्य / फोटो इत्यादी काढणे.
- प्रवेश, बाहेर, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी, मतदान कक्ष, धूम्रपान मनाई इ. फलक मतदान केंद्रात योग्य ठिकाणी लावावेत.
- मतदार सुविधा पोस्टर्स (Voter Facilitation Posters) मतदान केंद्रावर डकविणे आवश्यक

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राची उभारणी

- मतदान केंद्र उभारताना खालील बाबींची खात्री करावीत.

1. मतदारांकरिता रांगा लावण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असावी.
2. स्त्री व पुरुषांच्या वेगवेगळया रांगा लावाव्यात.
3. मतदान अधिकारी यांचेमागे मतदान प्रतिनिधी यांना बसण्याची जागा करावी.
4. गोपनियतेचा भंग होणार नाही याप्रमाणे मतदान केंद्राची उभारणी करावी.
5. मतदान केंद्रात मतदारांची ये-जा सुरळीतपणे होईल याप्रमाणे मतदान केंद्राची रचना करावी.
6. मतदान कक्षातील व्हीव्हीपीएटी वर थेट सुर्यप्रकाश पडू नये व त्यावर प्रखर प्रकाशाचा दिवा लावु नये.
7. मतदान केंद्रामधील राजकिय व्यक्तींचे छायाचित्र व चिन्हे झाकण्यात यावी.

# मतदान केंद्राची रचना



# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान कक्षाची उभारणी




- मतदार मतदान कक्षातील कोणते बटण दाबतो हे दृष्टीस पडणार नाही.
- मतदाराला मत नोंदविताना अडचण येणार नाही.
- VVPAT हे पहिल्या BU च्या डाव्या बाजुस ठेवावे.
- मतदान कक्षाच्या वर किंवा पुढे उच्च दाबाच्या प्रखर दिवा/ट्युबलाईट येणार नाही.याची खात्री करून घ्या.
- मतदान कक्षात पुरेसा प्रकाश उपलब्ध असेल.
- मतदानाच्या गुप्ततेचे उल्लंघन होणार नाही अशी मांडणी करावी.
- VVPAT तसेच CU ला जोडणारी केबलचे नुकसान होणार नाही किंवा अडथळा येणार नाही याकडे लक्ष द्यावे.
- मतदान कक्ष 24*24*30 इंच लांबीचा असतो.अतिरिक्त BU वाढल्यास प्रत्येकासाठी 12 इंच ने रुंदी वाढवावी लागते.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्रावरील सुरक्षा व्यवस्था

- प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक पोलीस बंदोबस्त नियुक्त करण्यात येईल.
- आपले मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह आपणांस मतदान केंद्रावर जावयाचे आहे.
- नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना मतदानाचे वेळी मतदान केंद्रामध्ये प्रवेश असणार नाही.
- नियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांनी मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या रांगा लावणे, मतदान केंद्राचे 100 मीटर परिसरात तोतयेगिरी वा निवडणूक प्रचार होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
- मतदान केंद्राच्या आत कोणतेही शस्त्र आणले जाणार नाही.व कोणत्याही मतदाराला धमकी देणार नाही किंवा धमकी देण्याची कोणतीही सूचक कृती करणार नाही याची दक्षता घ्यावी.
- संवेदनशील मतदान केंद्रावर अतिरिक्त पोलीस नियुक्त असतील. ते मतदान केंद्रामधील घडामोडीवर बाहेरून लक्ष ठेवतील.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्रावर वेबकास्टिंग

- निवडणुका घेण्यात पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्याकरिता मतदानाच्या दिवशी संनियंत्रण साठी वेबकास्टिंग वापर.ECI,CEO,DEO व निवडणूक निर्णय अधिकारी अवलोकन करतील.
- महानगरपालिका क्षेत्रात १००% आणि ग्रामीण भागात एकूण मतदान केंद्राच्या 50% मतदान केंद्रावर तेथे वेबकास्टिंग करण्यात येईल.
- मतदान केंद्रातील कॅमेरा द्वारे पुढील बाबी रेकॉर्ड केल्या जातील.1)रांगेतील मतदार 2)मतदान अधिकारी द्वारे मतदारांची ओळख पटविण्याची प्रकिया 3)बोटावर पक्की शाई लावणे 4)मतदान अधिकारी 3 द्वारे कंट्रोल युनिट वरील Ballot बटण दाबणे 5)मतदार मतदान युनिट (BU) जवळ गेल्यावर BU चा दर्शनी भाग दिसणार नाही 6)मतदान प्रतिनिधी उपस्थिती 7)रांगेतील मतदारांना चिठ्ठी वाटप 8)BU,CU,VVPAT मोहोरबंद करणे.
- मतदान केंद्रावर ठळक अक्षरात "तुम्ही वेब कॅमेरा/सीसीटीव्ही निरीक्षणाअंतर्गत आहात" हा संदेश दर्शवण्यात यावा.
- मतदानाच्या तीन दिवस अगोदर वेबकास्टिंग ची तयारी केली जाईल.BLO व क्षेत्रिय अधिकारी "वेबकास्टिंग तयारी निर्धारित पद्धतीने केली आहे.कॅमेरा योग्य पद्धतीने लावला असुन योग्य पद्धतीने काम करत आहे." असे प्रमाणपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांना देतील.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदार सहायता कक्ष

- प्रत्येक मतदान केंद्राच्या/इमारतीच्या जागेसाठी मतदान कक्षांची संख्या विचारात न घेता मतदारांना त्यांची मतदार यादीतील नावे शोधण्यासाठी व मतदान केंद्र माहित होणेसाठी मतदार सहाय्यता कक्ष उभारण्यात येईल.
- मतदार सहाय्यता कक्ष मतदान केंद्राच्या बाहेर आवश्यक कर्मचारी व साहित्यासह तयार करण्यात येईल.
- अशा कक्षात मतदार यादीशी संबंधित काम करणारे मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) व कर्मचारी नियुक्त असतील.
- अशा कर्मचाऱ्यांकडे मतदान केंद्राची इंग्रजी वर्णानुक्रमे मतदार यादी असेल. ज्या आधारे मतदाराचे मतदार यादीतील नाव शोधून मतदारास सहाय्य पुरविता येईल.
- "मतदार सहायता कक्ष" दर्शविणारा फलक त्याठिकाणी लावणे अपेक्षित आहे.

# भाग चार

# प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी

# मतदान सुरु करण्यापूर्वी तयारी

## मतदान प्रतिनिधी (Polling Agent) नेमणुक

- मतदान प्रतिनिधी यांनी मतदान सुरू होण्यापूर्वी किमान 90 मि. अगोदर मतदान केंद्रावर हजर असणे आवश्यक आहे तथापि, एखादा प्रतिनिधी केंद्रावर उशीरा आला तरीही त्याला मतदान केंद्रावरील पूढील कामकाजात सहभागी होण्याची परवानगी देण्यात यावी.
- मतदान केंद्रावर येणारे प्रतिनिधी सोबत नेमणूक- पत्र घेऊन येतील, त्याआधारे मतदान प्रतिनिधी यांचे कडील नेमणूक पत्रावरील उमेदवार / निवडणूक प्रतिनिधी यांच्या सहीची खात्री, तुम्हाला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुरविलेल्या सहीच्या नमुन्यावरून करून घ्यावयाची आहे.
- लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, 1951 चे कलम 128 अन्वये उपस्थित प्रतिनिधींना व निवडणूक कर्तव्यावरील सर्व संबंधितांना गोपनियतेची तरतूद वाचून दाखविणे आवश्यक आहे.
- प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधी/बदली मतदान प्रतिनिधी यांची हालचाल नोंदवही जोडपत्र 11 मध्ये ठेवण्यात यावी.

# मतदान सुरु करण्यापूर्वी तयारी

## मतदान प्रतिनिधी नेमणुक

- मतदान प्रतिनिधी हा त्याच विधानसभा मतदार संघातील रहिवासी व मतदार असणे आवश्यक आहे. तसेच त्याच्याजवळ EPIC किंवा शासनाने किंवा कोणत्याही शासकीय अभिकरणाने जारी केलेले मान्यताप्राप्त ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
- प्रत्येक उमेदवाराला प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान प्रतिनीधी व दोन बदली (reliever) मतदान प्रतिनीधी नेमता येतात. तथापि कोणत्याही विशिष्ट वेळी उमेदवाराच्या केवळ एकाच मतदान प्रतिनीधीला मतदान केंद्रात प्रवेश दयावा.
- मतदान प्रतिनिधी यांना दुपारी 3.00 नंतर नैसर्गिक विधी इत्यादीसाठी मतदान केंद्राबाहेर जाण्यास व परत येण्यास परवानगी असेल.
- मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रामध्ये मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, बिनतारी संदेश यंत्र इ. घेऊन जाण्यासाठी मुभा नाही. तसेच त्यांचेकडील मतदार यादी बाहेर घेऊन जाण्यास परवानगी असणार नाही.
- मतदान केंद्रामध्ये मतदान प्रतिनिधी यांचा बसण्याचा क्रम पुढीलप्रमाणे असेल.1)मान्यता प्राप्त राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार 2)मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार 3)राजकीय पक्षाचे राखीव चिन्ह देण्यात आलेले आहेत ते उमेदवार 4)नोंदणीकृत परंतु मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांचे उमेदवार 5)अपक्ष उमेदवार
- निवडणूक प्रक्रिया पारदर्शक रितीने पार पाडण्यास तुम्ही बांधील असल्याचा विश्वास प्रतिनिधीमध्ये निर्माण करावा.

# मतदान सुरु करण्यापूर्वी तयारी

## मतदान प्रतिनिधी नेमणुक

**जोडपत्र - ११**

(प्रकरण-२, परिच्छेद २.१२)

**मतदान प्रतिनिधी/कार्यमोचक प्रतिनिधी यांचे ये-जा नोंदपत्रक**

| अनु. क्रमांक | लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव | विधानसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव | उमेदवाराचे नाव | राजकीय पक्षाचे नाव | मतदान प्रतिनिधी/ कार्यमोचक प्रतिनिधीचे नाव | प्रवेशाची वेळ | स्वाक्षरी | निर्गमनाची वेळ | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | |

**जोडपत्र-१२**

**प्रवेशपत्राचा नमुना**

(मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षाने द्यावयाचा)

अनुक्रमांक

**प्रवेशपत्र**

विधानसभा मतदारसंघ व नाव :

मतदान केंद्र क्रमांक व नाव :

उमेदवाराचे नाव :

मतदान प्रतिनिधीचे नाव :

कार्यविमोचक प्रतिनिधीचे नाव, कोणी असल्यास :

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

**मतदान प्रतिनिधी हालचाल नोंदवही**

**मतदान प्रतिनिधी प्रवेशपत्र नमुना**

# MOCK POLL



महाराष्ट्र
अभिरूप (मॉक) मतदानाच्या वेळी
लक्षात ठेवा या
६ गोष्टी
लोकसभा निवडणूक २०१९
राष्ट्रीय महोत्सव
१ किमान ५० अभिरूप मतदानानंतर CLOSE बटन दाबा
२ निकालाची खातरजमा करण्यासाठी RESULT बटन दाबा
Result Button
Clear Button
Close
Total
Print Button
३ प्रत्येक उमेदवारासाठी EVM चे निकाल हे VVPAT च्या मतपावतीशी (स्लीप) सुसंगत आहेत का, याची खात्री करा
४ कंट्रोल यूनिटवरील अभिरूप मतदानाची माहिती नष्ट करा. यासाठी CLEAR बटन दाबा
५ VVPAT च्या ड्रॉप बॉक्समधून मतपावत्या काढून घ्या. दिलेल्या शिक्क्याने त्यांच्या मागे 'अभिरूप मतदान पावती' असा शिक्का मारा
६ कंट्रोल यूनिट आणि VVPAT ड्रॉप बॉक्समध्ये मते नाहीत, हे मतदान प्रतिनिधींना (पोलिंग एजंट) पटवून द्या. यासाठी TOTAL बटन दाबा
भारत निवडणूक आयोग | www.eci.gov.in

# MOCK POLL

- ही तयारी केंद्राध्यक्षाने उमेदवार अथवा त्यांचा निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी करायला हवी. (90 मि. अगोदर)
- मतदान प्रतिनिधी निर्धारित वेळेत उपस्थित नसेल तर 15 मिनिटे वाट पाहून मॉकपोल सूरू करावा.
- **NO MOCK POLL, NO POLL!**

# अभिरूप मतदान/ मॉक पोल : क्रम

1. CU वरील CLEAR बटन दाबा
2. सर्व मतदारांना शून्य मत असल्याचे दाखवा
3. VVPAT मधील चिठ्ठ्या संकलन होणारी पेटी रिकामी असल्याचे दाखवा
4. मतदान अधिकारी व सर्व मतदान प्रतिनिधी यांनी मतदान कक्षात उपस्थित राहणे
5. मतदान प्रतिनिधींनी पसंतीनुसार निळे बटन दाबून मतदान करणे.
6. किमान ५० इतकी मते टाकावीत.
7. CU वरील CLOSE बटन दाबावे. नंतर RESULT बटन दाबावे.
8. VVPAT मधील चिठ्ठ्या संकलन होणाऱ्या पेटीतील चिठ्ठ्या संकलित करा.
9. CU वरील निकाल व VVPAT मधील चिठ्ठ्या यांची तुलना करा. निकालाचा मेळ घ्या.
10. या कागदी चिठ्ठ्या काळ्या लिफाफ्यात ठेऊन मतदान प्रतिनिधी सह्या घ्या व स्वत:ची सही केंद्रध्याक्षाने करावी.
11. "अभिरूप मतदान चिठ्ठी" अशा मजकुराचा रबरी शिक्का VVPATच्या कागदी चिठ्ठीवर उमटवा.
12. CU वरील CLEAR बटन दाबा.
13. लिफाफ्यावर "अभिरूप मतदानाच्या VVPAT कागदी चिठ्ठ्या" असे नाव टाका. तसेच मतदारसंघ, मतदान केंद्र नाव व नंबर टाका.
14. हा लिफाफा गुलाबी कागदी मोहरेने मोहोरबंद करा.केंद्राध्यक्ष व प्रतिनिधी सह्या घ्या.
15. अभिरूप मतदान प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करा.

# मतदान सुरु करण्यापूर्वी तयारी

## मतदान यंत्राची जोडणी

- बॅलेट युनिट हे निवडणुक निर्णय अधिकारी यांचेस्तरावर तयार होत असल्याने त्याची कुठलीही पुर्व तयारी करावयाची आवश्यकता नाही.
- VVPAT हे देखील निवडणुक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर तयार होत असल्याने त्याची कुठलीही पुर्व तयारी करावयाची आवश्यकता नाही.
- BU व VVPAT हे मतदान कक्षात राहतील व सी.यु.हे मतदान अधिकारी 03 यांच्याकडे राहील. अशी रचना करून घ्यावी.VVPAT हे BU च्या डाव्या बाजूला ठेवण्यात यावे.
- बॅलेट युनिट ची केबल VVPAT ला लावावी आणि VVPAT ची केबल ही कंट्रोल युनिट ला लावावी.(B-V-C).
- बी.यु.,सी.यु.व VVPAT ची जोडणी करताना मतदान यंत्र हे बंद असावे (cu-power switch off) .
- सी.यु. चे power switch बटन दाबण्यापुर्वी सगळी जोडणी सुस्थितीत असल्याची व व्हीव्हीपीएटी मागील नॉब हा उभा (vertical) असल्याची खात्री करावी.
- त्यानंतर कंट्रोल युनिट सुरु करावे.

# मतदान सुरु करण्यापूर्वी तयारी

## VVPAT बाबत महत्वाचे




VVPAT LOCK POSITION (Horizontal paper rolling Knob )




VVPAT UNLOCK POSITION (Vertical paper rolling Knob )

- VVPAT यंत्रावर सूर्यप्रकाश पडणार नाही याची दक्षता घ्यावी व त्याप्रमाणे मतदान कक्षामध्ये त्याची रचना करावी.
- तसेच VVPAT यंत्रावर बल्ब अथवा ट्यूब लाईट यासारख्या कृत्रिम प्रकाश किरणांचाही थेट प्रकाश पडणार नाही याची काळजी घ्यावी.
- EVM-VVPAT यंत्र सुरू केल्यानंतर VVPAT यंत्रामधून स्वयंचलितरित्या 7 स्लिप VVPAT बॉक्स मध्ये जमा झाल्यानंतरच चाचणी मतदान / प्रत्यक्ष मतदान सुरूवात करावी.
- VVPAT ची वाहतूक करतांना पेपर रोल नॉब आडव्या (Horizontal) स्थितीत ठेवण्याची दक्षता घ्यावी.
- VVPAT यंत्र चाचणी मतदानासाठी / प्रत्यक्ष मतदानासाठी वापरतांना पेपर रोल नॉब उभ्या (Vertical) स्थितीत ठेवण्याची दक्षता घ्यावी.
- VVPAT यंत्र चाचणी मतदानानंतर मतदान प्रक्रीयेसाठी मोहरबंद करण्यापूर्वी पेपर रोल नॉब आडव्या (Horizontal) स्थितीत ठेवण्याची दक्षता घ्यावी.
- प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी पेपर रोल नॉब उभ्या (Vertical) स्थितीत ठेवूनच CU ये Power Supply बटन On करावे.
- मतदान प्रक्रीया संपेपावेतो पेपर रोल नॉब उभ्या (Vertical) स्थितीत राहील याची दक्षता घ्यावी व त्यामध्ये कोणताही फेरबदल करू नये

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अभिरूप मतदान (मॉकपोल)

- मॉकपोल हे मतदान सुरु होण्याच्या किमान दीडतास (90 मिनिटे )अगोदर करावयाचे आहे.
- अभिरूप मतदान वेळी किमान दोन उमेद्वार यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे आवश्यक.**मतदान प्रतिनिधी उपस्थित न झाल्यास 15 मिनीटे वाट पाहु शकता व त्यानंतर मॉकपोल सुरु करु शकता.**
- मॉकपोल करतांना बी.यु. व व्हीव्हीपीएटी हे मतदान कक्षात राहतील व सी.यु. हे मतदान अधिकारी 03 यांच्याकडे राहील.
- एक मतदान अधिकारी मतदान प्रतिनिधीसोबत मतदान कक्षात उपस्थित राहील व बॅलेट युनिट व व्हीव्हीपीएटी च्या मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवील. तो मतदानाच्या नोंदी देखील ठेवील.
- प्रत्येक उमेद्वाराला (नोटासह) किमान एक मत नोंदवुन **मॉकपोलसाठी 50 मतदान होईल** याची दक्षता घ्यावी.
- मॉक पोल पुर्वी मतदान यंत्रामध्ये कोणतेही मतदान नाही याची स्वतः खात्री करावी व मतदान प्रतिनिधींना खात्री करुन दयावी.
- त्यासाठी गरज पडल्यास Clear बटन दाबावे.
- Clear बटन दाबल्यावर INVALID असा संदेश आल्यास Close, Result, Clear अशी प्रक्रिया पुर्ण करावी.
- व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्स मध्ये कोणतीही चिट्ठी नसल्याची उपस्थितींना खात्री करुन दयावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अभिरुप मतदान (मॉकपोल)

- मतदान अधिकारी 03 यांनी कंट्रोल युनिट वरील Ballot बटण दाबुन मतदान कक्षात उपस्थित मतदान अधिकारी व उमेद्वार प्रतिनिधी यांना मत नोंदविण्यास व ज्या उमेद्वाराला मत दिले त्यानुसार VVPAT मध्ये Disply दिसत असल्याची खात्री करून द्यावी.
- मॉकपोल नंतर Total चे बटन दाबुन 50 मतदान झाल्याबाबत खात्री करावी.
- अशा अभिरुप मतदानानंतर Close बटन दाबावे.त्यानंतर Result बटन दाबावे.
- त्यानंतर सी. यु. वर दिसणा-या निकालाची नोंद वेगळी ठेवण्यांत यावी.
- व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्स मध्ये पडलेल्या पेपर स्लिप उमेदवार निहाय मोजुन तो निकाल कंट्रोल युनिटवर सादर झालेल्या निकालाशी अनुरुप (Tally) असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.
- त्यानंतर Clear बटन दाबुन सर्व डाटा पुसुन टाकावा. (IMPORTANT)
- व्हीव्हीपीएटी च्या ड्रॉप बॉक्स मधील स्लीपच्या मागे “MOCK POLL SLIP” असा शिक्का मारावा व विहीत पध्दतीने सदर स्लीप सील करुन ठेवण्यांत याव्यात.
- व्हीव्हीपीएटी चा ड्रॉप बॉक्स ऐड्रेस टॅग लावुन सिल करावा.
- त्यानंतर मतदान केद्राध्यक्षांनी जोडपत्र 5 भाग 1 मध्ये अधिरुप मतदान प्रमाणपत्र दयावे.
- सर्व प्रकारचे सील, अभिरुप मतदान प्रमाणपत्रावर उपस्थित मतदान प्रतिनिधी स्वाक्षरी करु शकतील.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अभिरूप मतदान (मॉकपोल) चिठ्या सील करणे






- VVPAT मधिल स्वयंचलित 7 चिठ्या व चाचणी मतदानाच्या जमा झालेल्या 50 स्लिप काळ्या रंगाच्या लिफाफा मध्ये ठेवुन सदर लिफाफ्यावर मतदान केंद्राध्यक्ष व उपस्थित प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरी घेऊन सदर लिफाफा मोहोरबंद करावा.
- लिफाफा पुरविण्यात आलेल्या प्लास्टिक बॉक्स मध्ये ठेवुन त्यावर गुलाबी पेपर सील लावुन मोहोरबंद करावा.मतदान केंद्राध्यक्ष व उपस्थित प्रतिनिधी यांनी कागदी मोहरेवर स्वाक्षरी कराव्यात.
- मतदान केंद्राचा क्रमांक व नाव,विधानसभा मतदार संघाचा क्रमांक व नाव,मतदानाची तारीख याचा तपशिल प्लास्टिक बॉक्स वर नमूद करावा.
- सदर बॉक्स मतदान साहित्य सोबत संकलन केंद्रावर जमा करण्यात यावा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अभिरूप मतदान (मॉकपोल) प्रमाणपत्र

**जोडपत्र-५**

**(प्रकरण-१, परिच्छेद १.१२)**

**केंद्राध्यक्षाचा अहवाल**

भाग-एक : अभिरूप मतदान प्रमाणपत्र

निवडणूक नाव :

.......................................................................

...... (पूर्व मुद्रित करावयाचे)

विधानसभा मतदारसंघाचा/क्षेत्राचा क्रमांक व नाव : ............................ (पूर्व मुद्रित करावयाचे)

लोकसभा मतदारसंघाचा क्रमांक व नाव : ............................................
(पूर्व मुद्रित करावयाचे)

मतदान केंद्राचा क्रमांक

.......................................................................

......

(अ) अभिरूप मतदान घेणे व त्याच्या माहितीसाठ्याची पडताळणी करणे

| अनु. क्रमांक | उमेदवाराचे नाव (नोटासह उमेदवारांची नावे पूर्व मुद्रित करावयाची) | अभिरूप मतदानादरम्यान केलेल्या मतांची संख्या | निकाल पाहिल्यानंतर नियंत्रण युनिटवर दिसणाऱ्या मतांची संख्या | उमेदवारांच्या अनुसार व्हीव्हीपॅट छापील चिट्ठ्यांची संख्या | नियंत्रण युनिटवर दिसलेला निकाल व छापील चिट्ठ्यांची संख्या एकमेकांशी जुळत आहे/नाही | अपक्ष/पक्षाच्या संक्षिप्त नावासह मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | नोटा (वरीलपैकी कोणालाही नाही) | | | | | |
| | एकूण | | | | | |

वाप २०२७–२७अ



(ब) अभिरूप मतदानाची आकडेवारी निरंक करण्यासाठी नियंत्रण युनिटवरील “CLEAR” बटन दाबलेले आहे. (होय/नाही)

होय असल्यास, वरील वाक्य पेनाने लिहा.

.......................................................................

.......................................................................

(क) अभिरूप मतदानानंतर व्हीव्हीपॅटमधून सर्व मत चिट्ठ्या काढण्यात आलेल्या आहेत/नाहीत.

(ड) सर्व मतदान प्रतिनिधींना रिकामे व्हीव्हीपॅट दाखविलेले आहे/नाही.

(ई) प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी व्हीव्हीपॅटच्या संग्रह कप्प्यामध्ये मत चिट्ठ्या नाहीत याची खात्री केली आहे आणि मतदान प्रतिनिधींना ते दाखविलेले आहे/नाही.

(फ) एकूण मतदान शून्य असल्याचे मतदान प्रतिनिधींना दाखविण्यासाठी नियंत्रण युनिटवरील "TOTAL" बटन दाबलेले आहे/नाही.

(ग) अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅट मत चिट्ठ्यांवर "MOCK POLL SLIP" असा शिक्का उमटविला आहे/नाही आणि त्या काळ्या लिफाफ्यात लिफाफाबंद करून गुलाबी कागदी चिट्ठ्यांसह मोहोरबंद केल्या आहे/नाही.

(ह) पुढील व्यक्तींसमोर अभिरूप मतदान घ्यावे आणि अभिरूप मते जुळत असल्याचे व अभिरूप मतदानानंतर नियंत्रण युनिटमधील अभिरूप मते निरंक केल्याचे प्रमाणित करावे :

| अनुक्रमांक | मतदान प्रतिनिधींचे नाव | पक्षाचे नाव | उमेदवाराचे नाव | मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(आय) जर असल्यास, नियंत्रण युनिटवरील दर्शनी वेळ भारतीय प्रमाण वेळेपेक्षा ................ मिनिटांनी अधिक/कमी आहे.

(जे) सूक्ष्म निरीक्षकाची स्वाक्षरी (मतदान केंद्रावर नियुक्ती केली असल्यास)

**केंद्राध्यक्षाचे नाव व स्वाक्षरी**

(आय) याद्वारे, असे प्रमाणित केले जाते की, प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी, **एकूण मतदान शून्य** असल्याची खात्री करण्यासाठी सर्व मतदान अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियंत्रण युनिटचे TOTAL बटन दाबलेले आहे. उचित निरीक्षणावर खूण करावी.

(एक) नियंत्रण युनिटवर दिसणारे एकूण मतदान : ०

**किंवा**

(एक) नियंत्रण युनिटवर दिसणारे एकूण मतदान ० पेक्षा अधिक आहे (अभिरूप मतदानाची मते निरंक केलेली नाहीत), म्हणून, अभिरूप मतदानाची मते निरंक करा.

**(केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी)**



वरील प्रक्रियेसाठी पुढील साक्षीदार असतील आणि नियंत्रण युनिटमधील अभिरूप मते निरंक केली असल्याचे प्रमाणित करावे आणि प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी व्हीव्हीपॅटच्या संग्रह कप्प्यामधून अभिरूप मतदानाच्या सर्व मत चिट्ठ्या काढण्यात आलेल्या आहेत :

| अनुक्रमांक | मतदान अधिकाऱ्याचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## 4 STEPS :मतदान यंत्र – मोहोरबंद करणे




हिरवी कागदी मोहोर




स्पेशल स्टॅग




ऐड्रेस स्टॅग

- अभिरूप मतदान (मॉक पोल) पुर्ण झाल्यानंतर आणि अभिरूप मतदान नष्ट केल्यानंतर कंट्रोल युनिट बंद करावे.तसेच VVPAT चा मागील नॉब आडवा (Horizontal) करावा.
- VVPAT मधील ड्रॉप बॉक्स मधिल सर्व चिठ्या काढुन त्या सीलबंद केल्याची खात्री करावी.

अ)हिरवी कागदी मोहोर- कंट्रोल युनिट Result विभाग सील करण्यासाठी

ब)स्पेशल स्टॅग-Close बटण भोवती लावायला

क)ऐड्रेस स्टॅग- CU चा Result विभाग व VVPAT ड्रॉप बॉक्स सिलबंद करण्यासाठी

ड)गुलाबी पेपर सील- अभिरूप मतदान चिठ्या प्लास्टिक बॉक्स सील करण्यासाठी

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## STEP 1) कंट्रोल युनिट हिरवी कागदी मोहोर सील





- कंट्रोल युनिट च्या Result भागाच्या आतील बाजुस असलेल्या छोट्या दरवाजाच्या आतील बाजूवर हिरवी कागदी मोहोर लावायची आहे.
- नवीन हिरवी कागदी मोहोर आता दोन्ही टोकांच्या पांढऱ्या बाजुवर स्व चिकटपट्टीसह A व B असे चिन्हांकित केले आहे.नविन मोहोर स्व चिकटक्षम असल्याने आता ABCD पट्टी सील लावण्याची गरज नाही.
- हिरवी कागदी मोहर लावण्यापुर्वी अनुक्रमांकाच्या अगदी खाली मतदान केंद्राध्यक्षांनी आपली स्वाक्षरी करावी. तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधींची सुध्दा त्यावर स्वाक्षरी घ्यावी.
- हिरवी कागदी मोहोर अशा प्रकारे बसवा की जेणेकरून मोहरेच्या पांढऱ्या बाजूवरील हिरव्या रंग Result बटण वर येईल.व लाल रंग Print बटणाच्या वर येईल.
- हिरवी कागदी मोहर लावुन झाल्यावर छोटा दरवाजा बंद करावा. दरवाजा बंद केल्यानंतर हिरवा व लाल रंग दिसायला हवा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## STEP 2) कंट्रोल युनिट –स्पेशल स्टॅग सील







- Close बटनाच्या भोवती असलेल्या विशिष्ट जागेच्या आकाराचा व पोस्ट कार्डाच्या जाडी इतका स्पेशल टॅग असतो.
- स्पेशल टॅग वापरण्यापुर्वी पुढील बाजुवर कंट्रोल युनिटचा अनुक्रमांक नोंदवावा.
- स्पेशल टॅगच्या मागच्या बाजुस मतदान केंद्राध्यक्षांनी आपली स्वाक्षरी करावी. तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधींही त्यावर स्वाक्षरी करु शकतील व त्याच्या अनुक्रमांकाची नोंद घेवु शकतील.
- Result बटनाच्या आतील छोट्या कप्प्याला असलेल्या छिद्रात धागा टाकुन स्पेशल टॅग लावावा.Close बटणाच्या कप्प्यामध्ये स्पेशल टॅग बसवताना बटण झाकले जाणार नाही याची काळजी घ्यावी.
- स्पेशल टॅग लावल्यानंतर Result विभागाचा बाहेरचा दरवाजा बंद करावा.बंद केलेल्या दरवाजाच्या दोन्ही बाजूला हिरव्या मोहोरेचे ढिल्ली टोके दिसतील.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## STEP 3) कंट्रोल युनिट – ऐड्रेस स्टॅग सील








- Result विभागाचा बाहेरचा दरवाजा ऐड्रेस स्टॅग लावावा .त्यावर कंट्रोल युनिट क्रमांक ,मतदानाचा दिनांक टाकावा.मतदान केंद्राध्यक्ष तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधी स्वाक्षरी करावी.
- त्यानंतर हिरव्या कागदी मोहोरेची “A” बाजूची चिकटपट्टी काढून टाकण्यात येईल.व Result विभागाच्या बाहेरच्या बाजुवर चिकटवा.
- कागदी मोहोरेची “B” भागाची चिकटपट्टी काढून टाकावी व B भाग कागदी मोहरेच्या “A” बाजूच्या खालोखाल वरच्या बाजूला अशा पद्धतीने चिकटवावा की जेणेकरून मोहरेचा अनुक्रमांक वर दिसेल.
- फाटलेली अगर चुरगळलेली हिरवी कागदी मोहोर किंवा स्पेशल स्टॅग वापरू नये.
- **नमुना 17 C च्या भाग 1 मधिल अनुक्रमांक 10 मध्ये कागदी मोहोरांचा हिशोब नोंदवावा.**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## STEP 4) VVPAT- ड्रॉप बॉक्स मोहोरबंद करणे






- VVPAT मधील ड्रॉप बॉक्स मधिल अभिरूप मतदानाच्या सर्व चिठ्या काढुन टाकल्याची खात्री करावी.
- VVPAT ड्रॉप बॉक्स दोरा व ऐड्रेस स्टॅग सहाय्याने मोहोरबंद करावा.त्यासाठी दोन ऐड्रेस स्टॅग लागतील.
- ड्रॉप बॉक्स सील करताना मतदान केंद्राध्यक्ष व उपस्थित मतदान प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात.
- VVPAT ड्रॉप बॉक्स सील केल्याशिवाय मतदान चालु करू नये.

- कंट्रोल युनिट व VVPAT मोहोरबंद केल्यानंतर VVPAT चा मागील नॉब उभ्या (Vertical) स्थितीत करून घ्यावा.
- त्यांनतर कंट्रोल युनिट चे मागील Power Supply बटण चालु करून मशिन मतदानासाठी तयार ठेवावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान यंत्र सदोष झाल्यास

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष मतदाना दरम्यान (During Actual Poll) | CU खराब झाल्यास<br>BU खराब झाल्यास | BU,CU व VVPAT संपूर्ण संच बदला | • प्रत्येक उमेद्वारास एक मत देऊन अभिरूप मतदान (मॉकपोल) घ्या.<br>• मतदान युनिट बंद करून सीलबंद करा.<br>• VVPAT  बॅटरी काढून घ्या.<br>• जोडपत्र 5 चा भाग एक व पाच भरा. |
| | CU ची बॅटरी खराब झाल्यास | केवळ CU ची बॅटरी बदला | • अभिरूप मतदान नाही.<br>• जोडपत्र 5 चा भाग 2 भरा. |
| | VVPAT खराब झाल्यास | केवळ VVPAT बदला | • अभिरूप मतदान नाही.<br>• VVPAT  बॅटरी काढून घ्या.<br>• जोडपत्र 5 चा भाग 5 भरा. |
| | VVPAT बॅटरी खराब झाल्यास | केवळ VVPAT ची बॅटरी बदला | • अभिरूप मतदान नाही. |
| प्रत्यक्ष मतदानापूर्वी (Before Actual Poll) | CU,BU,VVPAT यापैकी कोणतेही खराब झाल्यास | जे युनिट खराब आहे केवळ तेवढेच बदला | • नविन युनिट सह अभिरूप मतदान घ्या.<br>• जोडपत्र 5 चा भाग एक व चार भरा.<br>• खराब युनिट क्षेत्रिय अधिकारी कडे द्या. |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## नियंत्रण युनिट वरील संदेश व अर्थ

| CU वरील सुचना | सुचनांचा अर्थ | उपाय |
|---|---|---|
| Clear बटण दाबल्यावर invalid संदेश आल्यास | योग्य क्रमाने कृती केलेल्या नाहीत | Close,Result,Clear ही बटण क्रमाने दाबा (C-R-C) |
| BU NOT RESPONDING | मतदान युनिट (BU) प्रतिसाद देत नाही. | BU ची केबल व्यवस्थित जोडा.थम्ब व्हिल च्या क्रमाने BU जोडणी करा. |
| VVPAT NOT CONNECTED | VVPAT जोडले गेलेले नाही. | CU चे मागिल स्विच बंद करा. व VVPAT पेपर नॉब उभा (Vertical) करा. |
| PRESSED ERROR BU 01 | BU चे बटण अडकले आहे. | BU तपासणी करा.त्यात कोणते बटण मध्ये काही अडकलेले असल्यास काढा. |
| CHANGE BATTERY CU/VVPAT | संबंधित यंत्राची बॅटरी सदोष झाली आहे. | सबंधित यंत्राची बॅटरी बदलणे आवश्यक आहे. |
| VVPAT 2.1/2.3…2.14 किंवा VVPAT REPLACE | VVPAT सदोष झाले आहे. | VVPAT बदलणे आवश्यक आहे. |
| BU....KEY…NOT OK/BU READY LED NOT OK | मतदान युनिट BU सदोष झालेले आहे. | BU बदलणे आवश्यक आहे. |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान यंत्र सदोष झाल्यास

- **प्रत्यक्ष मतदानपुर्वी (अभिरूप मतदान पर्यंत) मतदान युनिट बदलणे-**
- BU,CU,VVPAT यापैकी कोणतेही युनिट सदोष झाल्यास क्षेत्रीय अधिकारी यांना कळविणे.क्षेत्रीय अधिकारी समक्ष केवळ जे युनिट (BU,CU,VVPAT) सदोष झाले तेवढेच बदलावे.व सदोष युनिट क्षेत्रिय अधिकारी कडे सोपविणे.

- **प्रत्यक्ष मतदानादरम्यान मतदान युनिट बदलणे-**
- प्रत्यक्ष मतदान दरम्यान BU किंवा CU सदोष झाल्यास सर्व संच म्हणजेच BU,CU,VVPAT क्षेत्रीय अधिकारी समक्ष बदलण्यात यावे. अशा वेळी मॉकपोल घेण्यात यावा व प्रत्येक उमेद्‌वारास (नोटासह) केवळ एक मत देण्यात यावे.सदोष युनिट सीलबंद करून साहित्य संकलन केंद्रावर जमा करावे.
- प्रत्यक्ष मतदाना दरम्यान VVPAT सदोष झाल्यास केवळ VVPAT क्षेत्रीय अधिकारी समक्ष बदलावे.या परीस्थितीत अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नाही. VVPAT ड्रॉप बॉक्स ऐड्रेस स्टॅग ने सील करून पुढील मतदान घ्यावे.सदोष युनिट सीलबंद करून साहित्य संकलन केंद्रावर जमा करावे.

- **CU किंवा VVPAT बॅटरी बदलणे-**
- अभिरूप मतदान दरम्यान किंवा प्रत्यक्ष मतदान वेळी CU किंवा VVPAT बॅटरी बदलवयाची असल्यास क्षेत्रीय अधिकारी यांना कळवावे त्यांचे समक्ष बॅटरी बदलण्यात यावी.व CU चा बॅटरी कक्ष पुन्हा ऐड्रेस स्टॅग लावुन मोहोरबंद करून त्यावर त्यांच्या सह्या घेईल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## VVPAT चिट्ठी छापली किंवा कापली जात नसेल तर

- लोंबणारी चिट्ठी काढण्याचा/कापण्याचा प्रयत्न करू नका. ड्रॉप बॉक्स मद्ये ती चिट्ठी पडण्यासाठी कोणतेही प्रयत्न करू नये.ती लोंबत्या स्थितित राहू द्यावी.कारण याचा अर्थ कंट्रोल युनिट मध्ये मत नोंदविले गेले नाही.
- अशा घटनेचा तपशिल मतदान केंद्राध्यक्ष नोंदवहीत पुढील प्रपत्रात करण्यात यावा.

1) घटनेचा दिनांक व वेळ-

2)मतदार यादीतील भागामध्ये मतदाराचे नाव व त्याचा अनुक्रमांक,ज्याला VVPAT बदलल्यानंतर मतदान करण्याची परवानगी होती.

3)VVPAT बदलल्यानंतर मतदाराने मतदान केले किंवा मतदान न करता निघून गेला.

4)घटना घडण्यापूर्वी एकूण मतांची संख्या

❖ **अशा प्रसंगी VVPAT बदलल्यानंतर शेवटच्या मतदाराला मतदान करण्याची परवानगी आहे.**

❖ प्रत्यक्ष मतदान वेळी संपूर्ण संच (BU,CU,VVPAT) बदली केल्यास घेण्यात येणाऱ्या अभिरूप मतदान च्या VVPAT मधिल चिठ्ठ्या कागदी लिफाफ्यात मोहोरबंद करून त्यावर VVPAT चिठ्यांचा आकडा लिहून "संपूर्ण इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व VVPAT संच बदलल्यास घेण्यात आलेल्या अभिरूप मतदानाशी संबंधित VVPAT कागदी चिठ्ठ्या" असे लिहिणे आवश्यक आहे.

# भाग पाच

# मतदानास प्रत्यक्ष सुरुवात व मतदान अधिकारी कामकाज

# प्रत्यक्ष मतदानास सुरूवात

## मतदान गुप्ततेची शपथ

### लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 कलम 128 - मतदान गुप्त राखणे

❖ मतदानास सुरूवात होणाऱ्या अगोदर मतदान केंद्रामध्ये उपस्थित सर्वांना वाचून दाखवावे.

- 1) जो निवडणुकीमध्ये मत नोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधात काही काम करतो असा प्रत्येक अधिकारी लिपीक किंवा अन्य इसम याला मतदान गुप्त राखावे लागेल, तसेच ते राखण्यास मदत करावी लागेल आणि ज्यामुळे अशी गुप्तता भंग पावेल असे मानण्याजोगी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाही.
- 2) जी व्यक्ती वरील बाबीचे उल्लंघन करील ती व्यक्ती तीन महिन्यापर्यंतचा कारावास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदानास सुरुवात करणे

- मॉकपोल नंतर प्रत्यक्ष मतदान सुरु झाल्यावर मतदान केंद्राध्यक्षांनी न चुकता कंट्रोल युनिटच्या डिस्प्लेवर (poll start time) जो दिनांक व वेळ दिसतो त्याची नोंद ठेवावी.
- मॉकपोल झाल्यानंतर कंट्रोल युनिटमधील सर्व निकाल पुसण्याची व व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्समधुन सर्व स्लीप काढून घेवुन सिल केल्याबाबतची खात्री केल्यानंतर आयोगाने विहित केलेल्या) वेळेत मतदान सुरु करावे.
- मतदान सुरु करण्यापुर्वी उपस्थित मतदान प्रतिनिधी यांना मतदाराची चिन्हांकित प्रत दाखवुन त्यामध्ये PB, EDC व DELETED याव्यतिरिक्त कुठल्याही खुणा नाहीत हे दाखवुन दयावे.
- मतदारांची नोंदवही (नमुना 17 अ) मध्ये प्रथम मतदार स्वाक्षरी करण्यापुर्वी मतदान अधिकारी,मतदान केंद्राध्यक्षसह नोंदवही तपासुन घेईल.आणि नमुना 17 अ मध्ये "नियंत्रण युनिट तपासणी केली आहे.व एकूण शुन्य असल्याचे आढळले आहे" अशी शाईने नोंद करेल.
- मतदानास प्रारंभ करताना मतदान केंद्राध्यक्ष प्रतिज्ञापत्र जोडपत्र 6 भाग एक उपस्थित असणाऱ्या व्यक्तींना मोठ्याने वाचुन दाखवावे.व त्यावर सही करावी.व उपस्थित मतदान प्रतिनिधी यांच्या सह्या घ्याव्यात.
- मतदान सुरु झाल्याबाबत क्षेत्रीय अधिकारी यांना कळवावे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्रात प्रवेश प्राप्त व्यक्ती

- 1) मतदार
- 2) मतदान अधिकारी
- 3) प्रत्येक उमेद्वार,त्याचा निवडणूक प्रतिनिधी व नियुक्त केलेला एकावेळी एकच मतदान प्रतिनिधी
- 4) निवडणूक आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्ती
- 5) निवडणूक कामावरील सरकारी सेवक
- 6) मतदारासोबत असलेले कडेवरील मुल
- 7) मदतीशिवाय चालु न शकणाऱ्या अंध व अपंग सोबत व्यक्ती
- 8) मतदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा मतदानाच्या कामात मदत करण्यासाठी तुम्ही प्रवेश दिलेली व्यक्ती

❖ मतदानावेळी मतदान केंद्राला भेट देणारे निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, सुक्ष्म निरीक्षक,उमेदवार व त्याचा निवडणूक प्रतिनिधी, झोनल दंडाधिकारी यांची VISIT SHEET ला नोंद घेण्यात यावी. व केंद्राध्यक्ष दैनंदिनी मध्ये मुद्दा 19 ब मध्ये तपशिल देण्यात यावा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## फोटो ओळखपत्र (EPIC) नसलेल्या मतदाराची ओळख पटवण्यासाठी इतर पुरावे

- 1)आधार कार्ड
- 2)मनरेगा जॉबकार्ड
- 3)बँक/पोस्ट ऑफिस ने दिलेले फोटोसहित पासबुक
- 4)कामगार मंत्रालय कडून देण्यात आलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड
- 5)ड्रायव्हिंग लायसन्स
- 6)पॅनकार्ड
- 7)NPR अंतर्गत RGI ने दिलेले स्मार्ट कार्ड
- 8)भारतीय पारपत्र (पासपोर्ट)
- 9)निवृत्त कर्मचाऱ्याचे फोटो असलेले पेन्शनची कागदपत्रे
- 10)शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम/कंपनी कामगार इ.ओळखपत्र
- 11)खासदार/विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांना दिलेले कार्यालयीन ओळखपत्र
- 12)सामाजिक न्याय विभागाकडून वितरीत Unique Disability ID (UDID) कार्ड

**फक्त व्होटर सुचना स्लिप (Voter Information Slip) च्या आधारे मतदारास मतदान करता येणार नाही.VIS घेऊन येणाऱ्या मतदारास ओळखपत्र किंवा इतर ओळखीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान अधिकारी कामे व कर्तव्य

### पहिला मतदान अधिकारी

- मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा प्रभारी
- मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी

### दुसरा मतदान अधिकारी

- पक्क्या शाईचा प्रभारी.
- नमुना १७-अ मधील मतदार नोंदवहीचा प्रभारी.
- मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेईल.
- प्रत्येक मतदाराला मतदार चिट्टी देणे
- मतदार नोंदवहीमध्ये मतदाराचा ओळख पुरावा नमुद करेल. उदा. EPIC नंबर

### तिसरा मतदान अधिकारी

- कंट्रोल युनिटचा प्रभारी
- मतदार चिट्ठी जमा करुन घेणे.
- कंट्रोल युनिटवरील उचित बटण दाबून मतदान युनिट सुरु करेल.

# प्रत्यक्ष मतदानास सुरुवात

## मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी साहित्य वाटप

| | |
|---|---|
| मतदान केंद्राध्यक्ष | • चिन्हांकित फोटो मतदार यादी |
| | • प्रदत्त मतपत्रिका |
| | • सर्व नमुने व लिफाफे |
| मतदान अधिकारी -1 | • चिन्हांकित फोटो मतदार यादी |
| | • मतदानाचे आकडेवारी तक्ता |
| मतदान अधिकारी -2 | • मतदार नोंदवही (व्होटर रजिस्टर) 17 अ |
| | • मतदार चिट्ठी (व्होटर स्लिप) |
| | • इंडेलीबल इंक बॉटल |
| मतदान अधिकारी-3 | • कंट्रोल युनिट |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## पहिला मतदान अधिकारी

पहिला
मतदान
अधिकारी



- प्रथम मतदान अधिकारी कडे चिन्हांकित मतदार यादी असेल.
- मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी त्याची असेल.
- मतदार प्रथम या मतदान अधिका-याकडे जाईल. व स्वतःचे नाव सांगेल किंवा BLO/उमेदवार यांनी दिलेली मतदाराचे नाव व अनुक्रमांक नमूद असलेली ओळखचिट्ठी दाखविल.तथापि मतदान अधिकाऱ्यांना अशा ओळखचिट्ठीची सक्ती करता येणार नाही.
- मतदाराचे मतदार यादीतील नाव शोधुन मतदान अधिकारी 1 मतदाराला ओळखीचा पुरावा सादर करण्यास सांगतील.निवडणूक आयोगाच्या सुचनांनुसार ओळखपत्र वा ओळखीसाठी आवश्यक इतर पुरावे अनिवार्य केलेले आहेत.(प्रत्येक निवडणुकीवेळी आयोग इतर ओळखीचे पुरावेबाबत आदेश जाहीर करील.)
- पुरावा दिला नसल्यास मतदाराला मत नोंदविण्यासाठी परवानगी देऊ नये.
- मतदाराच्या नावाचा तपशिल मतदान अधिकारी मोठ्याने वाचून दाखवतील.ज्याद्वारे उपस्थित प्रतिनिधी यांना मतदाराचे ओळखीबाबत खात्री करून घेता येईल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## पहिला मतदान अधिकारी




- ❖ मतदाराची फोटो ओळखपत्रावरून किंवा ओळखिच्या इतर पुराव्यावरून ओळख पटल्यानंतर अशा मतदाराचे चिन्हांकित मतदार यादीतील नाव लाल शाईने तिरपी रेषेत काट करेल.
- ❖ पुरुष व स्त्री मतदारांची सुलभ पडताळणी व गणना करण्यासाठी स्त्री मतदारांच्या अनुक्रमांकाला गोल करण्यात येईल.आणि तृतीय पंथी मतदारांच्या अनुक्रमांक जवळ एक चांदणी (STAR) खुण करण्यात येईल.
- ❖ फक्त व्होटर सुचना स्लिप (Voter Information Slip) च्या आधारे मतदारास मतदान करता येणार नाही.VIS घेऊन येणाऱ्या मतदारास ओळखपत्र किंवा इतर ओळखीचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.
- ❖ मतदान केंद्रावर पडदानशीन (बुरखाधारी) महिला मतदार पुरेसे असतील तर त्या महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी महिला मतदान अधिकारी यांची नेमणुक केली जाईल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## विशेष प्रसंगी पहिला मतदान अधिकारी कार्यवाही

- एखादी व्यक्ती मतदान ओळखपत्रसह आली तरी देखील त्याचे/तिचे नाव मतदार यादीत नसेल तर ती व्यक्ती मतदान करू शकत नाही.
- ज्या मतदारांना टपाली मतपत्रिका देण्यात आलेल्या आहेत, AVSC,AVPD,AVES,AVCO मतदार बाबत चिन्हांकित मतदार यादीत PB म्हणुन चिन्हांकित केले असेल तर मतदान केंद्रात मतदान करण्यास परवानगी देता येणार नाही.
- मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप आल्यानंतर अशा मतदाराला व आक्षेपकाला मतदान केंद्राध्यक्षकडे पाठवावे.
- परदेशी (Oversees) मतदारांसाठी त्यांची ओळख मूळ पारपत्र (passport) आधारेच पटविता येईल.
- मतदाराच्या ओळखीविषयी खात्री झाली असेल तर मतदारांच्या यादीत मतदाराच्या नावांच्या नोंदीसंबंधी झालेल्या केवळ लिपिकीय दोषांकडे किंवा छपाईच्या चुकांकडे दुर्लक्ष करावे.
- राजकीय पक्ष/उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधी यांनी मतदारांना दिलेल्या अनौपचारिक ओळख चिठ्यावर उमेदवाराचे नाव,पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह असू नये.मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधी यांच्या लक्षात आणून द्यावी.असे प्रकार ताबडतोब थांबविण्यास सांगावे.उमेदवार किंवा राजकीय पक्षाकडून देण्यात आलेली चिट्ठी ओळख पटविण्याचा मान्यताप्राप्त दस्तऐवज नाही.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अनुपस्थित,स्थलांतरित व मयत मतदारांसाठी (ASD)

- ❖ प्रत्येक मतदान केंद्रावर जोडपत्र 13 अ नुसार अनुपस्थित (Absent),स्थलांतरीत (shifted) व मयत (dead) मतदारांची यादी पुरविण्यात येईल.
- ❖ अशा यादीतील मतदार मतदानास आल्यानंतर मतदान अधिकारी क्रमांक 01 ने याबाबत मतदान प्रतिनिधी यांना नाव वाचुन कल्पना दयावी.
- ❖ अशा मतदारांची फोटो ओळखपत्राच्या आधारे किंवा निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे इतर ओळखीच्या पुराव्या आधारे मतदान केंद्राध्यक्ष यांनी कसुन तपासणी करून ओळख पटवावी.
- ❖ अशा मतदारांकडून जोडपत्र 14 मधील घोषणापत्र भरुन घ्यावे. व त्या घोषणापत्रावर मतदान केंद्राध्यक्ष यांनी देखील स्वाक्षरी करावी.
- ❖ अशा मतदारांबाबत दुसऱ्या मतदान अधिकारी कडील मतदार नोंदवही (17 अ) मध्ये सही सोबत अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा.सदर मतदार साक्षर असेल व सही करू शकत असेल तरीही सही बरोबर त्याचा अंगठ्याचा ठसा घेणे आवश्यक आहे.
- मतदान केंद्राध्यक्षांनी ए.एस.डी. यादी मधील किती मतदारांने मतदान केले याचे स्वतंत्र प्रमाणपत्र दयावे,जे की, नोंदवही 17A च्या छाननीच्या वेळेस वापरता येईल.
- मतदान केंद्रावर व्हिडीओग्राफी/फोटोग्राफीची सुविधा आहे अशा ठिकाणी अशा मतदारांची छायाचित्र घ्यावीत.
- सुक्ष्म निरिक्षकांनी याबाबीचे पालन होते का याची अचुक तपासणी करून अहवालात याबाबत नमुद करावे.

# तर्जनीला शाई लावण्याची योग्य रीत



# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## दुसरा मतदान अधिकारी




- दुसरा मतदान अधिकारी कडे पक्की शाई,मतदार नोंदवही (17अ), मतदार चिठ्ठी असेल.
- मतदान करून देण्यासाठी पक्क्या शाईची खुण करणे तसेच मतदार नोंदवही मध्ये मतदाराची नोंद करून सही अंगठा घेणे व मतदारास मतदार चिट्ठी देणे हे कर्तव्य.

- **पक्क्या शाईची खुण करणे-**
- मतदान अधिकारी 2 मतदारांच्या डाव्या हाताची तर्जनी पाहील आणि त्यावर शाईची निशाणी नाही ना याची खातरजमा करील आणि नंतर त्यावर शाईचे चिन्ह करील. हे चिन्ह अशा रितीने करण्यात येईल की शाई नखाच्या मुळात आणि नखावरील कातडीवर पसरेल आणि त्यामुळे तर्जनीवर शाईची स्पष्ट खुण राहील.
- मतदाराने डाव्या हाताची तर्जनी तपासुन घेण्यास किंवा खुण करून घेण्यास नकार दिला किंवा अगोदरच खुण असेल तर त्याला मतदान करण्यास परवानगी देऊ नये.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## दुसरा मतदान अधिकारी

- **मतदाराच्या बोटावर शाई लावण्याची पद्धत**

1. डाव्या हाताच्या तर्जनीवर
2. डाव्या हाताची तर्जनी नसल्यास बाजूच्या इतर बोटावर
3. उपरोक्त दोन्ही नसल्यास उजव्या हाताच्या तर्जनीवर
4. उपरोक्त तीनही नसल्यास उजव्या हाताच्या उपलब्ध बोटावर
5. दोन्ही हात नसल्यास डाव्या किंवा उजव्या हाताच्या उपलब्ध भागाच्या टोकावर



- **मतदार नोंदवही (नमुना 17 अ) मतदाराची नोंद करून सही/अंगठा घेणे**
- दुस-या मतदान अधिका-याकडे नमुना 17A मध्ये मतदार नोंदवही (voter regi.) असेल, तो नोंदवहीत ओळख पटविलेल्या मतदारांची नोंद ठेवील व मतदाराची नोंदवहीवर स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेईल.
- मतदाराच्या फोटो ओळखपत्राच्या/ओळख पुराव्याच्या प्रकाराच्या व क्रमांकाच्या नोंदी मतदार नोंदवहीत घेईल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## दुसरा मतदान अधिकारी

- मतदाराने नोंदवहीवर स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा करण्याचे नाकारल्यास त्याला मतदान करू देऊ नये.
- मतदार सही करू शकत नसेल तर डाव्या हाताचा अंगठा ठसा घ्यावा.तो साक्षांकित करण्याची गरज नाही.
- मतदाराला डाव्या हाताचा अंगठा नसेल तर उजव्या हाताचा अंगठा घेण्यात यावा.दोन्ही हाताचे अंगठे नसतील तर डाव्या हाताच्या तर्जनी पासुन सुरवात करून कोणत्याही एका बोटाचा ठसा घेण्यात यावा.डाव्या हाताला बोटे नसतील तर उजव्या हाताच्या बोटांचा ठसा घेण्यात यावा.जर त्याला बोटे नसतील तर मत नोंदविणे सहज शक्य नसल्याने सोबत्याची सही किंवा अंगठा घ्यावा व शेरा कॉलम मध्ये तसे नमूद करावे.
- मतदाराची स्वाक्षरी म्हणजे साक्षर मतदाराचे बाबतीत नाव व आद्याक्षरे.
- ASD मतदारांचे बाबतीत सही सोबत अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा.
- CSV मतदाराने नियुक्त केलेल्या Proxy मतदाराचे मत नोंदविण्यापुर्वी अशा मतदाराचा CSV मतदार यादीतील क्रमांक कॉलम 2 मध्ये नमूद करावा.व कंसात PV नमुद करून अशा मतदाराच्या मधल्या बोटावर शाईची खुण करण्यात यावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## दुसरा मतदान अधिकारी

- **मतदार नोंदवही नमुना 17 अ मधिल नोंदी**

1)मतदारांची नोंदवही (नमुना 17 अ) मध्ये प्रथम मतदार स्वाक्षरी करण्यापुर्वी मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्षसह नोंदवही तपासुन घेईल.आणि नमुना 17 अ मध्ये "नियंत्रण युनिट तपासणीकेली आहे.व एकूण शुन्य असल्याचे आढळले आहे" अशी शाईने नोंद करेल.

2)पहिल्या रकान्यात अनुक्रमांक 1 ने सुरवात करून लागोपाठ क्रमाने अनुक्रमांक लिहावे.

3)दुसऱ्या रकान्यात मतदाराचा मतदान यादीतील अनुक्रमांक नमुद करावयाचा आहे.

4)तिसऱ्या रकान्यात मतदाराने EPIC द्वारे ओळख पटविली असेल तर त्याबाबतीत EP,मतदान छायाचित्र असेल तर क्रमांक लिहण्याची गरज नाही.इतर पुराव्याच्या बाबतीत दाखविलेल्या पुराव्याच्या क्रमांकाचे शेवटचे चार अंक नमूद करावेत.तसेच पुराव्याचा प्रकार नमुद करावा.

5)चौथ्या रकान्यात स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा.

6)पाचव्या रकान्यात आवश्यकतेनुसार मतदानास नकार,गोपनीयता भंग,EDC मतदार,Test Vote अशा नोंदी आवश्यकतेनुसार घेण्यात याव्यात.

7)मतदान प्रकिया संपल्यानंतर शेवटचे मतदाराचे नोंदीखाली लाल शाईने आडवी रेघ ओढून त्याखाली "नमुना 17 अ मधिल शेवटच्या नोंदीचा अनुक्रमांक....असा आहे." अशी नोंद करून केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्षरी करावी.

## नियम १७ (अ)' मतदारांची नोंदवही

| अ.क्र. | मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक | मतदाराने ओळख पटविण्याकरिता दिलेल्या दस्ताचा तपशिल | मतदाराच्या सही / अंगठ्याचा ठसा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १४ | ४२५ | EP | SSR | मतदान करण्यास परवानगी दिली नाही - मतदान प्रक्रियेचा भंग केला. |
| १५ | ३१६ | आधार कार्ड - ९५०४ | - | स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा देण्यास नकार - मतदान परवानगी दिली नाही. |
| १६ | २०५ | वाहन चालक परवाना - ५६७० | ABC | - |
| १७ | ५ (ब.म.) (P.V.) | वाहन चालक परवाना - ५६७० | ABC | - |
| १८ | २९ | EP | JSD | मतदान न करता गेला |

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## दुसरा मतदान अधिकारी


नमुना १७ अ
(पहा नियम ४९एल)
मतदार नोंदवही
------------ मतदार संघातील लोकसभेची निवडणूक ----------
मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ----------------
मतदार यादीचा भाग क्रमांक ----------------

| अ.क्र. | मतदाराचा मतदार यादितील अनुक्रमांक | मतदाराने ओळखीचा पुरावा म्हणून सादर केलेल्या कागदपत्राचा तपशिल | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| इत्यादि | | | | |

दिनांक

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी


मतदारांसाठी चिठ्ठी

मतदारांच्या नोंदवहीच्या स्तंभ १ नुसार
मतदाराचा अनुक्रमांक : ..........197..........

मतदार यादीत नमूद केल्याप्रमाणे
मतदाराचा अनुक्रमांक : ..........39..........

मतदान अधिकाऱ्यांची स्वाक्षरी

- **मतदाराला मतदार चिठ्ठी देणे-**
- **मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खुण केल्यानंतर त्याच्याशी संबंधित नोंद मतदार यादीत घेतल्या नंतर आणि त्या नोंदवहीत सही/ अंगठा घेतल्यानंतर दुसरा मतदान अधिकारी त्या मतदारासाठी मतदार चिट्ठी देईल.**
- **मतदान साहित्यात मतदार चिठ्ठ्या पुरविण्यात येतील.**
- **मतदाराला मतदार चिट्ठी दिल्यानंतर CU चा प्रभारी असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकारी कडे मतदारास जाण्यास निर्देश करील.**
- **मतदान संपल्यानंतर तिसऱ्या मतदान अधिकारी कडे जमा झालेल्या चिठ्ठ्या पुरविण्यात आलेल्या लिफाफ्यात मोहोरबंद करून साहित्यात संकलन केंद्रावर जमा केल्या जातील.**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## तिसरा मतदान अधिकारी




- कंट्रोल युनिट मतदान अधिकारी 03 च्या ताब्यात राहील.
- मतदाराकडून मतदार चिठ्ठी (Voter slip) जमा करुन घेईल. व मतदाराच्या बोटाला शाईची खुण केल्याची खातरजमा करील.
- कंट्रोल युनिट (CU) मधुन BALLOT बटण दाबुन मतदाराला मतदान करण्यासाठी मतदान कक्षाकडे जाण्याची परवानगी देतील.
- बॅलेट बटण दाबल्यानंतर CU वरील Busy Lamp लागल्याची व मतदाराने मत नोंदविल्यानंतर बीप आवाज आल्याची खात्री करतील.
- दर दोन तासांनी व अंतिम नोंदविलेल्या मतांची आकडेवारी जमा झालेल्या मतदार चिठ्ठी व CU वरील Total बटण दाबुन केंद्राध्यक्ष व क्षेत्रीय अधिकारी यांना पुरवतील.
- मतदान संपल्यानंतर तिसऱ्या मतदान अधिकारी कडे जमा झालेल्या चिठ्ठ्या पुरविण्यात आलेल्या लिफाफ्यात मोहोरबंद करून साहित्यात संकलन केंद्रावर जमा केल्या जातील.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष जबाबदारी –मतदान केंद्र परिसर

- मतदान पथक- शिस्तबद्धपणा व निपक्ष:पातीपणा.प्रत्येक मतदाराशी सौजन्यपुर्वक व्यवहार करणे.
- प्रचारास बंदी- मतदान केंद्राच्या 100 मीटर अंतराच्या आत प्रचार करणे गुन्हा आहे.
- उमेदवार निवडणूक मंडप (बुथ)- 1)200 मीटर अंतराच्या पलीकडे 2)एक टेबल व दोन खुर्च्या 3)छत्री किंवा ताडपत्री उल्लंघन केल्याचे आढळल्यास क्षेत्रीय अधिकारी/पोलिस अधिकारी यांचे निदर्शनास आणावे.
- मतदान केंद्रामध्ये किंवा आसपास गैरशिस्त वर्तन-गुन्हा आहे.
- बेशिस्त व्यक्तिस मतदान केंद्रातून बाहेर काढावे.
- मतदारांना नेण्या-आणण्यासाठी उमेदवार कडून वाहतुकीची साधने वापरणे बेकायदेशीर-तक्रारदार कडून तक्रार प्राप्त झाल्यास क्षेत्रिय/क्षेत्र दंडाधिकारी मार्फत संबंधित उपविभागीय दंडाधिकारी कडे पाठवावी.
- मतदान केंद्रातून मतदान यंत्र आणि इतर मतदान साहित्य बाहेर नेणे हा-गुन्हा आहे.
- मतदान केंद्राच्या 100 मीटर परिसरात सेलफोन,स्मार्ट घड्याळ,कार्डलेस फोन,वायरलेस संच वापरण्यास परवानगी नाही. तथापि केंद्राध्यक्ष व सूक्ष्म निरीक्षक यांचा भ्रमणध्वनी ध्वनिविरीहीत अवस्थेत (silent mode) मतदान केंद्रात नेण्यास व बाळगण्यास परवानगी.
- मतदान केंद्रात किंवा मतदानकेंद्राजवळ हत्यारे घेऊन जाण्यास प्रतिबंध.
- निवडणूक अधिकारी यांनी पदीयकर्तव्याचा भंग केल्यास दखलपात्र अपराध.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रुपरेषा

### 1) नियुक्ती झाल्यानंतर

- सर्व प्रशिक्षण वर्गाना न चुकता उपस्थित राहावे.
- आपणास पुरविण्यात आलेले निवडणूक विषयक संदर्भ साहित्य अतिशय काळजीपूर्वक वाचून घ्या.
- प्रशिक्षणात सांगितलेल्या सुचना काळजीपूर्वक ऐकाव्यात.
- CU,BU,VVPAT ची हाताळणी प्रथम व द्‌वितीय प्रशिक्षण दरम्यान वारंवार करावी.
- निवडणूक विषयक सर्व तरतुदी,नियम व संविधानिक व असंविधानिक नमुने काळजीपूर्वक अभ्यासा.
- मतदान केंद्राध्यक्षासाठी निर्देश पुस्तिका,EVM व VVPAT च्या निर्देश पुस्तिकेतील सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा.
- टपाली मतदान किंवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र बाबत अर्ज सादर करावा.
- आपल्या शंका-कुशंकाचे निवडणूक निर्णय अधिकारी,सहा.निवडणूक निर्णय अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून पुर्ण समाधान करून घ्यावे.
- निवडणूक साहित्याशी पुर्ण परिचित व्हावे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रुपरेषा

### 2) मतदान दिवसाच्या अगोदरच्या दिवशी

- मतदान केंद्र नियुक्ती आदेश प्राप्त करून घ्या.सर्व पथकासह साहित्य वितरण टेबलवरून साहित्य ताब्यात घ्या.आदेशात नमूद क्षेत्रीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.
- नियुक्त केलेल्या मतदान केंद्राचेच साहित्य मिळाल्याची खात्री करा.त्यासाठी BU,CU व VVPAT वरील अनुक्रमांक व ऐड्रेस स्टॅग तपासणी करून घ्या.
- कंट्रोल युनिटचे कॅन्डीडेट सेट विभाग व्यवस्थित मोहोरबंद केल्याची खात्री करा.
- बॅलेट युनिट यथोचितरित्या मोहोरबंद केले आहे.व मतपत्रिका योग्यरीत्या लावल्याची खात्री करा.
- बॅलेट युनिट चे थम्ब व्हील बटण योग्यस्थितित असल्याची खात्री करा.
- जोडपत्र 3 नुसार सर्व साहित्याची तपासणी करून घ्या.
- चिन्हांकित मतदार यादीच्या प्रती,प्रमाणपत्र,मतदार संख्येसह बरोबर असल्याची खात्री करा.
- निवडणूक लढवणाऱ्या मतदारांची यादी,ASD,CSV यादी मिळाल्याची खात्री करा.
- बाणफुलीचे रबरी शिक्के,धातूची मोहोर,शाईची बाटली तपासणी करून घ्या.
- मतदान केंद्रावर जाण्याचा,येण्याचा मार्ग व वाहतुकीचे साधन माहिती करून घ्या.व नियुक्त केलेल्या वाहनातूनच क्षेत्रिय अधिकारी परवानगी घेऊन मतदान साहित्यासह प्रवास करावा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रूपरेषा

### 2) मतदान दिवसाच्या अगोदरच्या दिवशी

- मतदान केंद्रावर पोहचल्यावर सुखरूप पोहचले बाबत क्षेत्रिय अधिकारी यांना कळवावे.
- मतदान केंद्रावर मतदारांना थांबण्यासाठी पुरेशी जागा आहे.केंद्रामध्ये जाण्या-येण्यासाठी स्वतंत्र मार्ग असल्याची खात्री करून घ्या.
- मतदान केंद्राची सुचना,भित्तीपत्रके, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी मतदान केंद्राचे बाहेर ठळकपणे लावा.
- मतदान केंद्रामध्ये तुमची,प्रतिनिधी व यंत्राची जागा आदर्श मतदान केंद्राप्रमाणे निश्चित ठरवून घ्या.
- मतदान केंद्रात राजकीय पक्षांचे नेत्यांचे फोटो,निवडणूक चिन्ह विषयक बाबी काढुन/झाकून टाका.
- मतदान केंद्रावरील सर्व साहित्याची काळजीपूर्वक जपवणूक करावी.
- मतदान केंद्राचे क्षेत्र व मतदार संबंधीचा तपशिल दर्शवणारी सुचना ठळकपणे लावावी.
- 100 मीटर व 200 मीटर खुणा पांढऱ्या चुन्याने मारून घ्या.
- पथकातील सर्व कर्मचारी यांनी मतदान केंद्रावरच मुक्कामी थांबणेबाबत कार्यवाही करा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रुपरेषा

### 3)मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात आल्यावर

- मतदान साहित्य आपसात वितरीत करून घ्या.
- मतदान प्रतिनिधी नियुक्ती पत्र तपासुन पहा.त्यांना गोपनियतेच्या तरतुदी समजावून सांगा.
- तुमच्या पथकातील मतदान अधिकारी अनुपस्थित असल्यास क्षेत्रीय अधिकारी यांना कळवा.
- मतदान सुरु करण्याच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान 90 मिनिटे अगोदर अभिरूप मतदान (मॉकपोल) सुरु करा.
- चाचणी मतदान नंतर CU वरील अभिरूप मतदानाची माहिती काढून टाका.VVPAT ड्रॉप बॉक्स मधिल अभिरूप मतदानाच्या चिठ्ठ्या काढून मोहोरबंद केल्याची खात्री करा.अभिरूप मतदान प्रमाणपत्र तयार करा.त्यावर मतदान प्रतिनिधी स्वाक्षरी घ्या.
- कंट्रोल युनिटचा चा Result विभाग कागदी हिरवी मोहोर लावुन मोहोरबंद करा.VVPAT चा ड्रॉप बॉक्स ऐड्रेस स्टॅग लावुन सिलबंद करा.
- मतदान अधिकारी 2 कडील मतदाराची नोंदवही (नमुना 17 अ) मध्ये “नियंत्रण युनिट तपासणी केली आहे.व एकूण शुन्य असल्याचे आढळले आहे” शेरा नमूद करून स्वाक्षरी करा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रुपरेषा

### 4)मतदान चालु असताना-मतदान कालावधीत

- नेमून दिलेल्या वेळेतच मतदान चालु होईल याची खात्री करा.
- दैनंदिनी मध्ये वेळोवेळी नोंदी घेऊन दैनंदिनी अद्ययावत ठेवा.
- दर दोन तासांनी मतदानाची आकडेवारी गोळा करा.
- मतदान काही मिनिटे उशिरा सुरु झाले तरीही ठरवून दिलेल्या वेळेतच बंद करा.त्यावेळी मतदान केंद्रावरील रांगेत असलेल्या मतदारांना तुमची स्वाक्षरी असलेल्या चिठ्ठ्या द्याव्यात.
- मतदान सुरु असताना काही बाबतीत वेळोवेळी आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

1)एखाद्या मतदाराकडून आक्षेप

2)अल्पवयीन मतदाराकडुन मतदान

3)अंध किंवा अपंग मतदाराचे मतदान

4)मतदाराने मतदान करण्यास नकार देणे.

5)प्रदत्त मते

6)मतदानाच्या गोपनीयतेचा भंग

7)तोतयेगिरीला प्रतिबंध

8)VVPAT कागदी चिट्ठीवर छापलेल्या तपशिल बाबत तक्रार

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान केंद्राध्यक्ष विविध टप्प्यावरील कामांची रुपरेषा

### 5)मतदान पुर्ण झाल्यानंतर

- मतदानाची अंतिम आकडेवारी तसेच स्त्री पुरुष मतदान आकडेवारी तपासुन घ्या.
- मतदान यंत्र व VVPAT निर्देशानुसार मोहोरबंद करा.
- मतदान छायाचित्र ओळखपत्र शिवाय आणि पर्यायी कागदपत्रासह मतदान केलेल्या व ब्रेललिपीतील मतपत्रिका वापरून मतदान केलेल्या, ASD यादीतून मतदान करण्यासाठी उपस्थित राहिलेल्या मतदारांसह मतदान केलेल्या महिला मतदारांची संख्या किती ते पहा.
- नोंदविलेल्या मतांचा हिशोब (17 सी) तयार करून त्याच्या प्रती मतदान प्रतिनिधी यांना देऊन त्याबाबत प्रतिज्ञापत्र वर पोहोच घ्या.
- सर्व निवडणूक विषयक कागदपत्रे संविधानिक,असंविधानिक तयार करून लिफाफे मोहोरबंद करा.
- सर्व साहित्य बरोबर घेतल्याची खात्री करून संकलन केंद्राकडे नियुक्त वाहतूक आराखडा नुसार निघावे.
- टेबलनिहाय ठरवून दिलेले साहित्य जमा करून त्याची पोहोच घ्यावी.त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांच्याकडून कार्यमुक्ती आदेश घेऊनच संकलन केंद्र सोडावे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदान कक्षात प्रवेश करण्याचा केंद्राध्यक्षाचा विशेषाधिकार

- **खालील प्रसंगी मतदान केंद्राध्यक्ष यांना मतदान कक्षामध्ये उपस्थित मतदान प्रतिनिधी समवेत प्रवेश करता येईल.याबाबत मत नोंदविणाऱ्या मतदारास पूर्वसूचना द्यावी.**

- **1)मतदान युनिट (BU) व्यवस्थित पणे चालु नाही.अशी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी 3 यांची खात्री पटल्यास.**
- **2)मतदान कक्षात प्रवेश केलेला मतदार मतदार युनिट मध्ये (BU) गैरप्रकार करत आहे.किंवा त्यात व्यत्यय आणत आहे.**
- **3)एखादा मतदार कागद,चिकटपट्टी इ मतदान युनिट वर चिकटवून एखादी खोडसाळ गोष्ट करत असेल.**
- **4)मतदार मतदान कक्षात अवाजवी विलंब करत आहे.असा संशय आल्यास किंवा संशय घेण्यास पुरेसे कारण असल्यास मतदान युनिटची तपासणी करण्याकरिता,मतदान प्रकिया सुरळीत व व्यवस्थित चालु आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी मतदान कक्षात प्रवेश करण्याचा विशेषअधिकार आहे.**
- **5)VVPAT मधिल पेपर स्लिप बाबत मतदाराने केलेल्या आक्षेपाची खातरजमा करण्यासाठी.**

- **तथापि एखादया निरक्षर मतदाराने मतदान कसे करावे याबाबत मदत मागितल्यास मतदान कक्षात प्रवेश करुन मतदान प्रक्रिया समजुन सांगता येणार नाही. अशा वेळी पुठ्यावरील छापील बॅलेट युनिटच्या नमुन्याचे (Dummy BU) मदतीने मतदानाची प्रक्रिया समजुन सांगेल.**

# भाग सहा

# मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्त्वाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदाना दरम्यान येणारे प्रसंग व कार्यवाही

- नियम 49 एम. -मतदानास प्रतिबंध केलेले मतदार (मतदान केंद्राध्यक्ष कडून)
- नियम 49 ओ . - मतदानास नकार देणारे मतदार
- नियम 49 एम.ए. -VVPAT संदर्भातील चाचणी मतदान (Test Vote)
- नियम 49 एन. -अंध व दिव्यांग मतदारांचे मतदान
- नियम 49 पी. -प्रदत्त मते(Tendered Vote)
- नियम 49 जे. -आक्षेपित मते(Challenged vote)
- प्रॉक्सी मतदान (CVC)- बदली व्यक्तिद्वारे मतदान
- अर्हताकारी वयापेक्षा कमी वय-मतदाराचे वयाबाबतचे प्रतिज्ञापत्र

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदानास प्रतिबंद केलेले मतदार-नियम 49 M

- प्रत्येक मतदाराने मतदानाच्या **गोपनियतेचे पालन** केले पाहीजे व मतदान प्रक्रियेचा भंग करु नये.
- जर एखाद्या मतदाराने नेमुन दिलेल्या मतदान प्रक्रियेचा भंग केला आणि तुम्ही तशी संबंधीतास सुचना दिल्या नंतरही त्या मतदाराने मतदान प्रक्रियेचा भंग केल्यास नियम 49 एम अंतर्गत तुम्ही सदर मतदाराला मतदान करण्यास मनाई करु शकाल.
- अशा मतदारास मतदार चिठ्ठी दिली असल्यास ती काढून घेवुन रद्द करावी.
- दुसऱ्या मतदान अधिकारी कडील मतदार नोंदवही (नमुना 17 अ ) मध्ये शेरा रकान्यात **"मतदान करण्यास परवानगी दिली नाही –मतदान प्रकियेचा भंग केला"** अशी नोंद घ्यावी.
- मतदार नोंदवहीतील (नमुना 17 अ ) मधिल त्या मतदाराच्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही मतदाराच्या) अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.
- अशा मतदारांची नोंद **नमुना 17 क भाग एक**-नोंदविलेल्या मतांचा हिशोब मध्ये घ्यावयाची आहे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## मतदानास नकार देणारे मतदार-नियम 49 O

- **सही/अंगठा केल्यानंतर मतदानास नकार-**
- **दुसऱ्या मतदान अधिकारी कडील मतदार नोदवही (नमुना 17 अ) मध्ये नोंद घेण्यात आल्यानंतर व त्याने स्वाक्षरी/अंगठा केल्यानंतर मतदान करण्यास नकार दिल्यास त्यास मतदान करण्यास जबरदस्ती करु नये.**
- **नोंदवही 17अ  च्या शेरा रकान्यात " मतदान करण्यास नकार" अशी नोंद घ्यावी.अशा शेरा समोर मतदाराची सही किंवा अंगठा घ्यावा.अनुक्रमांक बदलण्याची आवश्यकता नाही.**
- **नमुना 17 क  च्या भाग 1-नोंदविलेल्या मतांचा हिशोब  मध्ये अनुक्रमांक 3 वर नियम 49-O वर मतदान करण्यास नकार दिलेल्या रकान्यात नोंद घ्यावी.**
- **जर कंट्रोल युनिटवर BALLOT बटन दाबुन मतदान यंत्र तयार असेल परंतु मतदाराने मतदानास नकार दिल्यास तर नोंदवही 17अ  च्या शेरा रकान्यात " मतदान करण्यास नकार" अशी नोंद घ्यावी. अशा शेरा समोर मतदाराची सही किंवा अंगठा घ्यावा.अनुक्रमांक बदलण्याची आवश्यकता नाही. व पुढे येणा-या मतदारास मतदान करण्यास अनुमती द्यावी.**
- **जर असा मतदार शेवटचा मतदार असेल व कंट्रोल युनिट वरील  BALLOT दिल्या गेले असेल तर नोंदवही 17 अ च्या शेरा रकान्यात नोंद घेऊन मतदान अधिकारी क्रमांक 03 ने कंट्रोल युनिट बंद करावेत, कंट्रोल युनिट पासुन व्हिव्हिपीएटी वेगळे करावेत. नंतर कंट्रोल युनिट सुरु करुन Close  हे बटन दाबावे.**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## VVPAT मधिल आक्षेपाबाबत –चाचणी मतदान नियम 49 MA

- जर एखाद्या मतदाराने बॅलेट युनिटवर केलेले मतदान व VVPAT वर आलेल्या प्रिंटमध्ये तफावत असल्याबाबत तक्रार केली तर एक टेस्ट वोट टाकण्याची तरतुद नियम 49 MA अन्वये करण्यात आलेली आहे.
- अशी तक्रार केल्यानंतर सदर मतदाराकडून लेखी प्रतिज्ञापत्र (जोडपत्र-17) भरुन घेण्यात यावे तत्पुर्वी अशा मतदारास चुकीचे प्रतिज्ञापत्र केल्यास होणाऱ्या परिणामांबाबत सुचना द्यावी.
- मतदार नोंदवही मध्ये (नमुना 17अ) मध्ये अशा मतदाराची पुन्हा नोंद घ्यावी, मतदार चिठ्ठी दयावी आणि उपस्थित मतदान प्रतिनिधी व मतदान केंद्राध्यक्ष यांच्या समक्ष मतदान कक्षात मतदाराने मतदान (चाचणी मतदान) करावे. केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांनी पेपर स्लिप अवलोकन करावे.
- तक्रार खरी आढळली तर मतदान प्रक्रिया बंद करावी व निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ कळवावे.
- तक्रार खोटी आढळल्यास म्हणजे चाचणी मतदानाशी VVPAT मधिल पावती जुळत असेल तर मतदान केंद्राध्यक्ष त्या मतदाराशी संबंधात दुसऱ्यांदा मतदार नोंदवहीत (नमुना 17 अ ) केलेल्या नोंदिसमोर ज्या उमेद्वाराला चाचणी मतदान केले त्याचे नाव व अनुक्रमांक नमूद करावा व शेऱ्यासमोर मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा घेणेत यावा.
- अशा चाचणी मतदानाची नोंद नमुना 17क भाग 1-नोंदविलेल्या मतांचा हिशोब अनुक्रमांक 5 मध्ये  घ्यावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अंध व दिव्यांग मतदारांचे मतदान-नियम 49 N

- एखादा मतदार अंधत्वामुळे किंवा शारीरीक अपंगत्वामुळे मतपत्रिकेवरील चिन्ह ओळखु शकत नसेल किंवा त्यासमोरील बटन दाबु शकत नसेल अशा मतदारांना त्याच्या पसंतीने 18 वर्षावरील सोबतीच्या मदतीने (मतदार ओळखपत्र किंवा इतर अधिकृत ओळखपत्र बाळगून) मतदान कक्षात जावुन त्यांचे मत नोंदविता येईल.
- जे अपंग मतदार स्वतः बटन दाबु शकतात अशा अपंग मतदाराच्या सोबतीस मतदार कक्षापर्यंत सोबत घेवुन जातील व असे अपंग मतदार स्वतः मतदान करतील.त्याचा सोबती मतदान कक्षाच्या आत नाही.
- अशा सोबत्याचे जोडपत्र 18 मध्ये प्रतिज्ञापत्र घ्यावे.
- असा सोबती केवळ एकाच मतदारासोबत जावु शकेल,एका पेक्षा जास्त मतदाराचे मदतनीस म्हणुन काम करता येणार नाही.
- अशा मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर व सोबत्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीवर विहित पध्दतीने खुण करावी.
- नमुना 14 अ मध्ये अशा मतदारांची व सोबत्यांची नोंद ठेवावी. मात्र जेथे एक प्राधिकृत सोबती केवळ मतदान कक्षापर्यंत गेला आहे परंतु आत प्रवेश केला नाही त्याची नोंद नमुना 14 अ मध्ये करू नये.
- नमुना 14 अ हा पांढऱ्या रंगाच्या संविधानिक लिफाफ्यात घालुन मोहोरबंद करून साहित्य संकलन कक्षाकडे सुपुर्द करावा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## प्रदत्त मते- Tendered Vote नियम 49 P

- एखादी व्यक्ती मतदार म्हणुन मतदान केंद्रावर आल्यास व तिच्या जागी दुसराच व्यक्ती आधी मतदान करुन गेल्याचे त्याच्या लक्षात आले व अशा व्यक्तीच्या ओळखीबद्दल मतदान केंद्राध्यक्षाची खात्री झाल्यास अशा व्यक्तीस प्रदत्त मतपत्रिकेवर मतदान करता येते.
- असे प्रदत्त मत केवळ मतपत्रिकेवरच नोंदवावे व असे मत मतदान यंत्रावर नोंदविता येणार नाही.
- प्रत्येक मतदान केंद्रावर 20 प्रदत्त मतपत्रिका पुरविण्यात येतील.
- दुसरा मतदान अधिकारी- मतदाराची नोंदवही नमुना 17 अ मध्ये प्रदत्त मतदाराची नोंद करायची नाही.
- नमुना 17 बी मध्ये प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदाराची यादी ठेवावी व त्यातील रकाना 5 मध्ये मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घ्यावा.
- मतदान केंद्रावर पुरविलेल्या प्रदत्त मतपत्रिकेवर मागील बाजुस प्रदत्त मतपत्रिका शिक्का मारलेला नसेल तर तुमच्या हस्ताक्षरात प्रदत्त मतपत्रिका असे लिहावे.
- मतदारास बाणफुली रबरी शिक्का देऊन मतदान कक्षात जाऊन प्रदत्त मतपत्रिकेवर मतदाराचे पसंतीच्या उमेदवाराचे निशाणीवर किंवा निशाणीसमोर मतदान करण्यास सांगावे. त्यानंतर मतदार त्याने दिलेले मत आजूबाजूला दिसणार नाही अशा पद्धतीने मतपत्रिकेची घडी करेल.व मतदान कक्षातून बाहेर येऊन केंद्राध्यक्ष यांचेकडे देईल.
- प्रदत्त मतपत्रिका स्वतंत्र लिफाफ्यामध्ये ठेवुन सदर लिफाफा सिल करावा.
- नमुना 17 क च्या भाग 1-नोंदविलेल्या मतांचा हिशोब अनुक्रमाक 09 मध्ये प्रदत्त मतपत्रिकेचा हिशोब ठेवावा.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## आक्षेपित मते-(Challenged vote नियम 49 J)

- विशिष्ट मतदार असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तिच्या ओळखीबाबत,उपस्थित मतदान प्रतिनिधी आक्षेपासाठी रोख रुपये 2/-इतकी फी जमा करून आक्षेप घेऊ शकतात. आक्षेप घेणाऱ्या प्रतिनिधीला (जोडपत्र – 19) मध्ये विहित केलेली पावती द्यावी.
- ज्या मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे.अशा मतदाराचे नाव व पत्ता यांची नोंद नमुना 14 मध्ये करण्यात यावी.व त्यावर मतदाराची सही किंवा अंगठा घेण्यात यावा.संबंधित मतदार सही करण्यास नकार देत असल्यास त्यास मतदान करण्याची परवानगी देवु नये.
- मतदाराची संक्षिप्त चौकशी(summary enquiry) केल्यानंतर सदर मतदार खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास (आक्षेप खोटा निघाल्यास) सदर मतदारास मतदान करु दयावे. व मतदान प्रतिनिधी ची अनामत रक्कम 2 /- रुपये जप्त करावेत.
- आक्षेप खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास व तो मतदार बोगस असल्याचे निदर्शनास आल्यास त्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करावी व अशा व्यक्तीची मतदान केंद्र ज्या पोलिस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रात येत असेल त्या पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याच्या नावा (जोडपत्र 20) अनुसार लेखी तक्रार करुन केंद्रावरील पोलीसांच्या हवाली करावे.
- सदर तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन गुन्हेगाराविरुध्द गुन्हा शाबित होईल, या दृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## आक्षेपित मतांची संक्षिप्त चौकशी

- मतदाराच्या ओळखीसंदर्भात आव्हान देणा-याला तो खरा मतदार नाही याबददल पुराव देण्यास सांगा.
- जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा देण्यास असमर्थ ठरल्यास त्याचे आव्हान अमान्य करा आणि ज्या व्यक्तीच्या ओळखीबद्दल आव्हान देण्यात आले आहे त्याला मतदान करुन दया.
- जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा सादर करु शकला तर त्या मतदाराला बोलावुन त्याच्याविरुध्दच्या आक्षेपाचे खंडन करण्यास सांगावे.जर तो योग्य पुरावा सादर करु शकला तर त्याला मतदान करु द्या. जर तो पुरावा सादर करु शकला नाही तर त्याच्याविरुध्द दिलेले आव्हान मान्य करा.
- चौकशीच्या काळात तुम्ही बनावट म्हणुन संशय असलेल्या मतदाराच्या शेजारच्या मतदाराकडे,त्या भागातील जबाबदार अधिकारीकडे त्याच्या खरे खोटेपणाबद्दल चौकशी करा. पुरावा घेताना तुम्ही आव्हान दिलेल्या व्यक्तीकडुन किंवा पुरावा देणा-या इतर व्यक्तीकडुन शपथेवर पुरावा घ्या.
- संक्षिप्त चौकशीत आक्षेप खोटा निघाल्यास (मतदार खरा असल्यास) अनामत रक्कम जप्त करावी. व मतदाराला मत नोंदवू दयावे.नमुना 14 च्या स्तंभ 10 मध्ये जप्त या शब्दाची नोंद करावी.
- संक्षिप्त चौकशीत आक्षेप खरा निघाल्यास (मतदार तोतया असल्यास) अनामत रक्कम आक्षेप घेणाऱ्याला त्याच्या नमुना 14 च्या स्तंभ 10 मध्ये सही करून परत करावी.व मतदान करण्यास मनाई करावी. पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याच्या नावा (जोडपत्र 20) अनुसार लेखी तक्रार करुन केंद्रावरील पोलीसांच्या हवाली करावे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## बदली व्यक्तीद्वारे (प्रॉकसी मतदान)

- भारतीय सेनादलातील वर्गीकृत मतदार (Classified Service Voter-CSV) यांना बदली व्यक्तिमार्फत मतदान करता येते.
- संबंधित मतदान केंद्राकरिता असे मतदार असल्यास CSV मतदारांची स्वतंत्र यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन साहित्यात पुरवली जाते.व ही यादी चिन्हांकित मतदार यादीचा भाग समजली जाते.
- CSV यादीमध्ये स्वतंत्र मतदारांचे अनुक्रमांक नोंदविलेले असतात.सदर यादीत Proxy Voter चे नाव नमूद केलेले असते.
- प्रत्यक्ष मतदान करणाऱ्या Proxy Voter ची ओळख हि नेहमीच्या पद्धतीने पटविण्यात यावी.
- मतदान अधिकारी 2 कडील मतदाराची नोंदवही (नमुना 17 अ) मध्ये दुसऱ्या रकान्यात CSV यादीतील अनुक्रमांक नोंद करण्यात यावी.व त्यापुढे PV अशी नोंद करण्यात यावी.उदा-CSV यादीमध्ये 5 क्रमांक असेल तर मतदार नोंदवहीत 5 (PV) अशी नोंद करण्यात यावी.
- अशा प्रकारच्या बदली मतदाराच्या (Proxy Voter) च्या डाव्या हाताच्या मधल्या बोटास शाईची खुण करण्यात यावी.
- बदली व्यक्ती त्या मतदार संघातील नोंदणीकृत मतदार असेल तर ती सेनादलातील मतदाराच्या वतीने मतदान करण्याव्यतिरिक्त स्वतःचे ज्या मतदान केंद्रात मतदान असेल त्या ठिकाणी मतदान करण्यास हक्कदार असेल.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024

## अर्हताकारी वयापेक्षा कमी वय-मतदाराचे वयाबाबत प्रतिज्ञापत्र

- एखाद्या मतदाराच्या वयाच्या बाबतीत त्याचे वय अर्हताकारी वयापेक्षा कमी असल्याचे मतदान अधिकारी यांना शंका येत असल्यास त्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे नोंदी घ्याव्यात.
- मतदाराची ओळख स्वकृतदर्शनी पटली असेल आणि मतदार यादीत त्याच्या नावाचा अंतर्भाव असल्याबाबत खात्री झाली असेल परंतु त्याचे वय मतदाराच्या किमान वयापेक्षा कमी आहे असे तुम्हाला वाटत असेल तर जोडपत्र -15 प्रमाणे त्या मतदाराकडून प्रतिज्ञापत्र घ्यावे.
- अशा मतदाराकडून प्रतिज्ञापत्र घेण्यापुर्वी खोटे प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1950 च्या कलम 31 नुसार त्यासाठी कोणत्या शिक्षेची तरतूद आहे त्याची माहिती द्यावी.
- ज्या मतदारांकडून अशी प्रतिज्ञापत्र घेतली असतील त्या मतदारांच्या नावांची यादी जोडपत्र 16 च्या भाग एक नुसार तयार करावी.
- मतदाराने प्रतिज्ञापत्र देण्याचे नाकारले असल्यास त्यास मतदान नोंदवू देऊ नये.किंवा ते मतदान न करता परत गेले असतील तर त्यांच्या नावांची यादी जोडपत्र 16 च्या भाग 2 प्रमाणे करावी.
